दैनिक
# राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com
नवी दिशा... नवे विचार.....
email:rajyaloktantra75@gmail.com
बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१७४ | सोमवार, दि.२० ऑक्टोबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

# शासकीय सोयाबीन खरेदी केंद्र नसल्याने शेतकरी अडचणीत

**बीड । प्रतिनिधी**

**जुलै व ऑगस्ट महिन्यातील अतिवृष्टी आणि सप्टेंबरमधील सततच्या पावसाने सोयाबीन पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. उत्पादनाची सरासरी यामुळे घटली अशातच खुल्या बाजारात सोयाबीनला हमीदरापेक्षा एक हजार ते १२०० रुपये कमी दर मिळत आहे. तर दुसरीकडे शासकीय सोयाबीन खरेदी केंद्र नसल्याने शेतकरी अडचणीत सापडले आहेत. शासकीय खरेदी केंद्र सुरू करावे अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.**

## सणासुदीच्या दिवसात शेतकऱ्यांना हमीभाव मिळेणा



अतिवृष्टीमुळे हजारो हेक्टर क्षेत्रातील सोयाबीन जुलै व ऑगस्टमध्येच नष्ट झाले आहे. उर्वरित क्षेत्रातील सोयाबीनला सततच्या पावसाचा फटका बसला आहे. उत्पादनाची एकरी सरासरी दोन ते तीन क्विंटलवर घसरली आहे. पेरणी ते काढणीपर्यंतचा खर्च बघितला तर खुल्या बाजारात मिळणाऱ्या दरात शेतकऱ्याच्या हाती काहीच लागत नाही अशी स्थिती आहे. सद्यःस्थितीत खुल्या बाजारात सोयाबीनला सरासरी चार हजार रुपयांचा भाव आहे. त्यातही आर्द्रतेमुळे या दरातही कपात करण्यात येत असल्याने शेतकऱ्यांच्या ▶▶ पान २ वर

### खुल्या बाजारातील दर न परवडणारे

दिवाळीचे दिवस असल्याने शेतकऱ्यांना पैशाची गरज आहे. अशावेळी शेतकरी जे काही थोडेफार सोयाबीन हाती लागले आहे ते बाजारात घेऊन जात आहेत. हमीभावापेक्षा खुल्या बाजारातील दर बराच कमी आहे. एकतर सोयाबीनचे प्रचंड नुकसान झाले असून अत्यंत कमी उत्पादन हाती आली आहे त्यात असा कमी दर असेल तर ते शेतकऱ्यांना परवडणारा नाही. शासनाने हमीभाव जाहीर केला मात्र खरेदी केंद्र परिसरात नसल्याने, अडचणी निर्माण झाल्या आहेत. जो हमीभाव जाहीर केला त्याचा काहीही उपयोग शेतकऱ्यांना होताना दिसत नाही. त्यामुळे शासकीय खरेदी केंद्र ताबडतोब सुरू करावे आणि शेतकऱ्याकडील सोयाबीन हमीभावाने खरेदी करावे अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

### मशागत खर्चही निघणे अवघड

सध्याच्या मातीमोल भावामुळे शेतकऱ्यांचा मशागत खर्चसुद्धा वसूल होत नाही. तातडीने सोयाबीन खरेदीसाठी शासकीय खरेदी केंद्रे सुरू करावीत, सर्व शेतकऱ्यांकडून हमीभावाने सोयाबीन खरेदी करण्यात यावी, दिवाळीपूर्वी खरेदी प्रक्रिया गतिमान करून शेतकऱ्यांना उत्पादनाचा योग्य मोबदला मिळावा, अशी मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे.

## थोडक्यात...

### जीएसटी कपातीनंतरही वस्तूंच्या मागणीत वाढ

● दिल्ली: २२ सप्टेंबरपासून लागू झालेल्या वस्तू आणि सेवा कराच्या दरांमध्ये कपातीमुळे नवरात्र आणि चालू सणासुदीच्या काळात ऑटोमोबाईल्स, ग्राहकोपयोगी वस्तू आणि एफएमसीजी उत्पादनांची विक्रमी विक्री झाली आहे, असे अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी शनिवारी सांगितले. तसेच सणासुदीच्या हंगामानंतरही वापराची मागणी टिकाऊ आधारावर टिकून राहण्याची अपेक्षा आहे. ''सणासुदीच्या मागणीनंतरही मागणी कायम राहील. याचा फायदा ग्राहकांना दैनंदिन आधारावर आणि कधीकधी होणाऱ्या खरेदीवर होईल. वापराची कथा सुरूच राहील,'' असे अर्थमंत्र्यांनी अधोरेखित केले. अर्थव्यवस्थेला अपेक्षित वाढ किंवा उपभोगाच्या मागणीबद्दल त्यांनी कोणताही अंदाज दिला नाही, परंतु त्यांनी पुढे नमूद केले की भारतातील सणांचा हंगाम संक्रांतीपर्यंत सुरू राहतो, जो जानेवारीच्या मध्यात येतो आणि तोपर्यंत उपभोगाच्या आकडेवारीची वाट पाहावी.

### चंद्रपूरमध्ये वाघाने केले शेतकऱ्याच्या शरीराचे तुकडे

● चंद्रपूर : चंद्रपूर जिल्ह्यात पुन्हा एकदा वाघाच्या हल्ल्याची थरकाप उडवणारी घटना रविवारी समोर आली आहे. गोंडपिपरी तालुक्यातील चेकपिपरी गावातील शेतकरी भाऊजी पाल यांच्यावर वाघाने हल्ला करून त्यांचा निर्घृणपणे जीव घेतला आहे. अधिक भीषण बाब म्हणजे, वाघाने शेतकऱ्याच्या शरीराचे तुकडे तुकडे केले, आणि ते तुकडे शेत परिसरात विखुरलेल्या अवस्थेत सापडले आहेत. ही घटना समजताच वनविभाग, पोलिस पथक व ग्रामस्थ घटनास्थळी दाखल झाले. वाघाने शरीराचे तुकडे तुकडे केल्याच्या या प्रकारामुळे वनविभागाचे अधिकारीसुद्धा स्तब्ध झाले आहेत. ही घटना अतिशय दुर्दैवी असून अशा प्रकारे शरीराचे तुकडे विखुरले जाण्याची घटना या भागात पहिल्यांदाच घडली आहे. सदर परिसरात वनविभागाने पथक तैनात केले असून वाघाची शोध मोहीम सुरू करण्यात आली आहे.

### ओबीसींवर अन्याय होणार नाही–मुख्यमंत्री

● नागपूर : मराठा समाजाला आरक्षण देताना ओबीसी समाजावर कोणताही अन्याय होऊ देणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात ओबीसी वसतिगृहांच्या केवळ घोषणा झाल्या, मात्र आमच्या सरकारने सत्तेत येताच ६० ओबीसी वसतिगृहे सुरू केली, अशी माहिती फडणवीस यांनी दिली. तसेच, आर्थिक महामंडळाला बळकटी देत १० लाख ओबीसी कुटुंबांना हक्काची घरे दिल्याचेही त्यांनी सांगितले. छत्रपती शिवाजी महाराजांनी १८ पगड जातींना एकत्रित केले, त्याप्रमाणे आपणही कोणत्याही समाजावर अन्याय करणार नाही, असे फडणवीस यांनी नागपूरमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलताना स्पष्ट केले.

# राज्यात ९६ लाख बोगस मतदार

## तुम्ही मतदान करा किंवा नका करू मॅच फिक्स ; राज ठाकरेंचा हल्लाबोल



**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात ९६ लाख बोगस मतदार भरले आहेत. आम्ही निवडणूक आयोगावर बोलतो प्रश्न विचारतोय सत्तधारी पक्ष का रागावतो आहे. कशा पद्धतीच राजकारण सुरु आहे हे सर्वांना माहिती आहे. राज्यातील स्थानिक पक्ष संपविण्याचे कारस्थान सुरु आहे. तुम्ही मतदान करा किंवा नका करू मॅच फिक्स आहे. ही कोणत्या पद्धतीची लोकशाही आहे. अशात निवडूक होणार असेल तर कशाला प्रचार करायचा, कशाला पैसा खर्च करायचा, अशा शब्दांमध्ये मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी महायुती सरकारवर हल्लाबोल केला. मुंबई– गोरेगाव नेस्को सेंटरमध्ये मनसे पदाधिकारी मेळाव्यात ते बोलत होते.

यावेळी राज ठाकरे म्हणाले की, निवडणूक आयोग हा सत्ताधारी पक्षांचा गुलाम नाही. कित्येक वर्षांपासून मतदारयाद्यांमध्ये घोळ सुरु आहे. याप्रश्नी आम्ही यापूर्वीही आवाज उठावला होता. विधानसभा निवडणूक झाली तेव्हा सत्ताधाऱ्यांचे २३२ आमदार निवडून आले. एवढे आमदार ▶▶ पान २ वर

# १ नोव्हेंबर रोजी मुंबईत विराट मोर्चा

## निवडणूक आयोगाच्या कारभाराविरोधात म.वि.आ पुन्हा आक्रमक



**मुंबई । प्रतिनिधी**

निवडणुकीचे मॅच फिक्सिंग झाले आहे. सुमारे एक कोटी बोगस मतदार असून, हे घुसखोर आहेत. यांना बाहेर काढणे गरजेच आहे. १ नोव्हेंबर निवडणूक आयोगाच्या कारभारावर मुंबईत एक विराट मोर्चा काढण्यात येईल. मतदारांची ताकद पंतप्रधान यांना दाखवली जाईल. या मोर्चाचे नेतृत्व शरद पवार, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे करतील, अशी माहिती शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी रविवारी (दि.१९) सर्वपक्षीय विरोधकांच्या संयुक्त पत्रकार परिषदेत दिली. या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे जयंत पाटील, मनसे नेते बाळा ▶▶ पान २ वर

### आयोगाचे निर्देश आणि उपाययोजना

राज्य निवडणूक आयोगाने १ जुलै २०२५ पर्यंत अद्ययावत केलेली मतदार यादी हरकतींसाठी प्रसिद्ध केली आहे. १६ जुलै २०२५ च्या आदेशानुसार, दुबार नावांवर उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्रत्येक मतदान केंद्रासाठी नियुक्त बूथ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली ही प्रक्रिया सुरू आहे. तसेच, राजकीय पक्षांनी बूथ एजंट नेमावेत, असा सल्लाही आयोगाने दिला आहे. मतदार यादी दुरुस्तीची प्रक्रिया सध्या सुरू असून, विरोधी पक्ष आता याबाबत कोणती भूमिका घेणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. दरम्यान, विरोधकांनी केलेल्या वेगवेगळ्या आरोपांचा खुलासा करताना आयोगाने सविस्तर उत्तर देत आरोप खोटे असल्याचे म्हटले आहे.

# जरांगेंचा खटाटोप राजकीय आरक्षणासाठी, यात बळी मात्र ओबीसी अन् भटक्या जातसमूहाचा गेला!

**मुंबई । प्रतिनिधी**

**जरांगेंचा सगळा खटाटोप राजकीय आरक्षणासाठी होता, यात बळी मात्र ओबीसीचा आणि भटक्या जातसमूहाचा गेला आहे, घटनेमधील सामाजिक न्याय देण्याचे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न या एका जीआरद्वारे आपण संपवले आहे, असे लक्ष्मण हाके यांनी म्हटले आहे.**

ओबीसी मेळाव्याच्या माध्यमातून ओबीसी नेते सरकारवर टीका करत आहेत. शासनाने हैद्राबाद गॅझेटियरचा शासन निर्णय रद्द करण्याची मागणी करत आहेत. त्याच पार्श्वभूमीवर लक्ष्मण हाके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिले आहे.

## लक्ष्मण हाकेंचे मुख्यमंत्र्यांना भावनिक पत्र; जिआर रद्द करण्याचे केले आवाहन



ओबीसी आरक्षणाची मसलत संपल्याचे त्यांनी या पत्रात म्हटले आहे. हाके यांनी पत्रात पुढे म्हटले आहे की, हैद्राबाद गॅझेटमुळे कुळातील, गावातील, नातेसंबधातील लोकांना कुणबी करणाद्वारे ओबीसी होण्याचा मार्ग मोकळा केला आहे. हा जीआर ओबीसी आरक्षणाचा गळा घोटणार हे दाव्याने सांगतो. जे नारायण राणे समितीला जमले नाही, जे गायकवाड आयोगाला जमले नाही, ते तुम्ही केले आहे, कोर्टात या जीआर ला किती अर्थ आहे हे आम्हाला माहिती आहे. पण आज रोजी ओबीसी आरक्षण संपले आहे, कारण सुप्रीम कोर्टाच्या भाषेत मराठा जात शासनकर्ती जात आहे त्यांच्या स्पर्धेत ▶▶ पान २ वर

# अंबडमधील बीअरबारमध्ये एकाचा मृत्यू

## पोलिसांच्या मध्यस्थीमुळे तनाव निवाळला

**अंबड । प्रतिनिधी**

अंबड शहरातील हॉटेल प्रिन्स बार मध्ये यशराज जिजा राठोड वय २२ वर्ष हा युवक एका हॉटेलमध्ये आचार्य असून सदरील हा व्यक्ती प्रिन्स बारमध्ये शनिवारी रात्री दारू पिल्यामुळे मृत्यू झाला याप्रकरणी अंबड पोलीस स्टेशन मध्ये घटनेची नोंद करण्यात आली. सदरील प्रिन्स बार व देशी दारू दुकान शासन नियमाच्या उल्लंघन करून कोणतेही वेळाचं पालन न करता सकाळी लवकर सुरू



करणे तसेच रात्री उशिरा बंद करणे असा प्रकार सुरू असल्याचे दिसून येत आहे यामुळे या रस्त्याने जाणाऱ्या येणाऱ्या महिलांना त्रास होत आहे. तसेच याप्रकरणी नगरपालिका मध्ये देशी दुकान व प्रिन्स बार हटविण्यासंदर्भात ठरवा झाला होता परंतु अद्याप पर्यंत काही झालं नाही असे पण बोलल्या जात आहे. २६ जानेवारी १५ ऑगस्ट तसेच इतर बंदच्या दिवशी पण या परिसरात दारू विक्री ▶▶ पान २ वर

# कांदा बाजारपेठ ११ दिवस बंद

**नाशिक । प्रतिनिधी**

दिवाळी सणाचे निमित्त समोर ठेवून राज्यातील विविध कांदा बाजारपेठा तब्बल ११ दिवस बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे आधीच तोट्यात असलेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या नुकसानीत आणखी भर पडली आहे, असे महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भारत दिघोळे यांनी सांगितले. दिघोळे म्हणाले, शेतकरी दिवसरात्र राबून कांद्याचे उत्पादन घेतो आणि त्याचा माल विक्रीसाठी आणल्यावर बाजार बंद असल्याची पाटी त्याच्या तोंडावर आपटली जाते. शेतकऱ्यांना दगड समजून त्यावर चालल्यासारखी वागणूक देणे आता थांबवले पाहिजे. हा प्रकार वर्षानुवर्षे सुरू असून, शेतकऱ्यांना दिवाळीच्या शुभमुहूर्तावरही अन्यायच वाट्यया येतो. राज्य शासनाने बाजार समित्यांना शिस्त लावणे अत्यावश्यक आहे.

# पळून जाणाऱ्या मुलींच्या बाबतीत साध्वी प्रज्ञासिंह यांचे वादग्रस्त वक्तव्य

**पुणे । प्रतिनिधी**

**आपल्या विधानांमुळे नेहमी वादाच्या भोवऱ्यात सापडणाऱ्या खासदार साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर यांनी पुन्हा एकदा वादग्रस्त वक्तव्य केले आहे. एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी मुलींना शिस्त लावण्यासाठी मारहाण करावी आणि ज्या मुली दुसऱ्या धर्माच्या**



**मुलासोबत जाण्याचा विचार करतात, त्यांचे पाय तोडून टाकावेत, असे आक्षेपार्ह विधान केले. हे वक्तव्य सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत असून, त्यावरून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत.**

एका कार्यक्रमात बोलताना साध्वी प्रज्ञासिंह यांनी पालकांना उद्देशून सांगितले की, ज्या मुली आपल्या पालकांची आज्ञा मोडतात, त्यांचा आदर करत नाहीत आणि घरातून पळून जाण्याचा ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१७ ऑक्टोबर २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३८.५० क्विंटल | २,३०० | २,७६० | २,५४३ |
| ज्वारी/हायब्रिड: ९२.५० क्विंटल | २,३०० | ३,२०० | २,६४४ |
| मका/लोकल: ७.५० क्विंटल | २,२५० | २,२५० | २,२५० |
| तूर : ९.५० क्विंटल | ६,१२५ | ६,१२५ | ६,१२५ |
| उडीद : २.५० क्विंटल | ४,००० | ५,२१० | ४,६०५ |
| बाजरी: ४१.०० क्विंटल | २,००० | २,८०० | २,५५८ |
| मुग: १.५० क्विंटल | ४,५०० | ४,५०० | ४,५०० |
| सोयाबीन: ५०९.५० क्विंटल | २,४५० | ४,१९० | ३,८८४ |
| हरभरा: २.०० क्विंटल | ४,००० | ५,४०० | ४,७६६ |

# चावीवाल्यानेच मारला १० लाखांच्या सोन्यावर डल्ला

**परळी । प्रतिनिधी**

**परळी शहरात माणुसकी आणि विश्वासाला काळिमा फासणारी अत्यंत धक्कादायक घटना उघडकीस आली आहे! लॉक दुरुस्त करण्याच्या बहाण्याने घरात शिरलेल्या एका 'चावीवाल्या'ने दिवसाढवळ्या चक्क १० लाख ४४ हजार रुपये किमतीच्या सोन्याच्या दागिन्यांवर हात साफ केला. मात्र, परळी शहर पोलिसांनी तातडीने सूत्रे हलवत, अवघ्या काही तासांतच या चोरट्याला जेरबंद करून त्याची हिंमत ठेचली आहे.**

शहर परिसरात शनिवारी (दि. १८) घडलेल्या या धाडसी चोरीच्या घटनेने खळबळ माजली होती. माणिक नगर भागात राहणारे पांडुरंग प्रभाकर लोखंडे यांच्या घरी कपाटाचा लॉक बदलण्यासाठी परळीतील बबूलू चावीवाला याला आणण्यात आले होते. कपाटाचे लॉक बदलण्याचे काम सुरू असतानाच, संधी साधून आरोपी बबूलूने लोखंडे यांना 'मारतुल' (हातोडीसारखे हत्यार) आणण्यासाठी सांगितले. लोखंडे कुटुंबीयांची नजर चुकवून, याच क्षणाचा फायदा घेत, या धूर्त चोरट्याने कपाटातून ८ तोळे ७ ग्रॅम वजनाचे, म्हणजेच १० लाख ४४ हजारांचे सोन्याचे दागिने लंपास केले ▶▶ पान २ वर

# परळीमधुन धावणार अमृत भारत एक्सप्रेस रेल्वे

**परळी वै.। वार्ताहर**

**परळी वैजनाथ ते मुंबई विशेष अमृत भारत एक्सप्रेस गाडी सुरू करावी तसेच लातूर ते मुंबई जाणाऱ्या लातूर एक्सप्रेसचा आठवड्यातून किमान चार दिवस परळी मार्गे नांदेड पर्यंत पल्ला वाढविण्यात यावा, परळी वैद्यनाथ ते नाशिक विशेष ज्योतिर्लिंग एक्सप्रेस गाडी सुरू करण्यात यावी यांसह विविध मागण्या माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे पत्राद्वारे केल्या आहेत.**

## परळी ते नाशिक ज्योतिर्लिंग दर्शन रेल्वे सुरू करण्याची धनंजय मुंडे यांची मागणी



परळी रेल्वे स्थानकावर भाविकांना माहिती देण्यासाठी विशेष माहिती केंद्र सुरू करावे त्याचबरोबर नांदेड पनवेल एक्सप्रेस गाडीला फर्स्ट क्लास एसी चे डबे वाढवून द्यावेत, परळी रेल्वे स्थानकावर पीपीटी लाईनला मंजुरी देण्यात यावी यांसह विविध मागण्या या पत्राद्वारे धनंजय मुंडे यांनी केल्या आहेत. ▶▶ पान २ वर

cmyk



## अग्रलेख

# भारताची संरक्षीत झेप !

मागच्या काही वर्षांपासून संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरतेचा विषय भारतीय संरक्षण विभागाच्या रडारवर असल्याचे दिसून येते. किंबहुना, आत्मनिर्भरतेचे हे मिशन अधिक गतीने पुढे जायला हवे, अशी भूमिका संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी मांडली आहे. हे बघता आगामी काळात संरक्षण सिद्धता व स्वावलंबनाच्या पातळीवर अधिक वेगवान काम होण्याची अपेक्षा असेल. ज्येष्ठ शिक्षणतज्ञ डॉ. शां ब. मुजुमदार यांच्या 'सिंबायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी'च्या स्कूल ऑफ डिफेन्स अँड एरोस्पेस टेक्नॉलॉजीचा उद्घाटन समारंभ संरक्षणमंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. या सोहळ्यात राजनाथसिंह यांनी केलेले भाषण अनेक अर्थांनी महत्त्वाचे म्हटले पाहिजे. संरक्षण साहित्य उत्पादन, आयात व निर्यातीसह पुढील उद्दिष्टांविषयी त्यांनी ज्या मोकळेपणाने ऊहापोह केला, हे पाहता भविष्यात नक्कीच या क्षेत्रात आमूलाग्र बदल होण्याच्या आशा बळावतात.

जग वेगाने बदलत आहे. नवा विचार, नवी व्यवस्था, नवे तंत्रज्ञान समोर येत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआयसारख्या तंत्रज्ञानाने तर नवीन क्रांतीच केल्याचे पहायला मिळते. अशा स्पर्धात्मक युगात कौशल्य विकासातूनच समर्थ, स्वावलंबी व आत्मनिर्भर भारताची उभारणी करणे शक्य होईल, असा विचार संरक्षणमंत्र्यांनी मांडला, तो योग्यच म्हणता येईल. कौशल्य विकास हा आजमितीला परवलीचा शब्द बनला आहे. म्हणूनच या युगात केवळ ज्ञान उपयुक्त ठरत नाही. त्याचे उपयोजन करण्याची कला अवगत असायला हवी, असे राजनाथसिंह म्हणतात. त्यातला मथितार्थ समजून घेतला पाहिजे. पदवी किंवा एखाद्या विषयाचे शिक्षण महत्त्वाचेच. पण, केवळ पुस्तकी शिक्षण व्यवहारात उपयोगी पडत नाही. त्याकरिता संबंधित व्यक्तीकडे कला किंवा कौशल्य असायला हवे. आज अनेक देशांमध्ये कुशल मनुष्यबळाची कमतरता आहे. ही गरज लक्षात घेऊन कौशल्य विकासाचे धडे आपल्याला घ्यावे लागतील. मुळात संरक्षण विभाग असो वा अन्य कुठलाही. कौशल्याशिवाय कुणाचेच पान हलत नाही. संरक्षण विभागाने मागच्या काही वर्षांत चांगलीच झेप घेतली आहे. गेल्या दहा वर्षांत आपली संरक्षण साहित्य निर्मिती ४६ हजार कोटी ऊपयांवरून तब्बल १ लाख ५० हजार कोटींपर्यंत पोहोचल्याचे आकडेवारी सांगते. यातील खासगी क्षेत्राचे योगदान आहे ३३ हजार कोटी. संरक्षण क्षेत्रात आता किती वाव आहे, हेच यातून अधोरेखित होते. २०२९ पर्यंत आपली उत्पादनक्षमता ३ लाख कोटींपर्यंत आणि संरक्षण साहित्य निर्यात ५० लाख कोटींपर्यंत नेण्याचे देशाचे उद्दिष्ट असल्याचेही संरक्षणमंत्र्यांनी उद्धृत केले आहे. हे उद्दिष्ट आपण नक्कीच पूर्ण करू शकतो, यात संदेह नाही. नव भारताच्या उभारणीत अनेक विभागांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. त्यात भारतीय संरक्षण विभाग अग्रेसरच म्हणावा लागेल. एक पाऊल पुढे, अशीच या विभागाची ख्याती राहिली आहे. देशाच्या संरक्षणासाठी प्रत्येक देशाला शस्त्रसज्ज असावे लागते. त्याचबरोबर सुरक्षा यंत्रणाही मजबूत कराव्या लागतात. या सगळ्यासाठी अत्याधुनिक साधने आवश्यक असतात. ती इतर शस्त्रसज्ज देशांकडूनही घेणे क्रमप्राप्तच असते. परंतु, परराष्ट्रीय धोरणातील चढउतार, ट्रम्प यांच्यासारख्या राज्यकर्त्यांमुळे बिघडलेले वातावरण बघता परावलंबित्व कमी करणे, हीदेखील कोणत्याही देशाची गरज आहे. या पार्श्वभूमीवर आत्मनिर्भर भारताचा नारा वास्तववादीच ठरावा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताला प्रत्येक क्षेत्रात स्वावलंबी बनवण्याचा ध्यास घेतला आहे. त्या अनुषंगाने संरक्षण विभागाकडून स्वदेशी शस्त्रनिर्मितीकरिता अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणात काम होत आहे. चार वर्षांत हा आकडा दुपटीने वाढणार असेल, तर त्याचे कौतुकच व्हायला हवे. आयात कमी करणे, निर्यात वाढवणे, यावर सध्या प्रामुख्याने भर दिला जात आहे. संरक्षण क्षेत्रात थेट विदेश गुंतवणुकीची मर्यादाही वाढवण्यात आली आहे. संरक्षण उत्पादनांची निर्मिती करणाऱ्या देश व कंपन्यांसोबत तंत्रज्ञान हस्तांतरण व संयुक्त उत्पादनाचे करारही करण्यात आले आहेत. त्याचे परिणाम आता दिसू लागले आहेत. स्वदेशी बनावटीचे डॉर्नियर २२८, आकाश, ब्राम्होस क्षेपणास्त्र प्रणाली रडार यांसह लहान शस्त्रास्त्रांसारख्या अनेक सामग्रींची निर्यात आज भारत करत आहे. त्यामुळे संरक्षण क्षेत्रातील निर्यातदार देश म्हणूनही आपली प्रतिमा तयार होत आहे. ही अभिमानास्पद बाब ठरावी. भविष्यातही भारताला देशांतर्गत उत्पादन वाढवण्यासह आयात निर्यातीचा ताळमेळ राखावा लागेल. आयात धोरणामध्ये लवचिकता दाखवतानाच निर्यात कशी आणि किती वाढवता येईल, हे बघायला हवे.

जागतिक संदर्भ बदलत आहे. ट्रम्प यांच्यासारख्या उथळ राज्यकर्त्यांमुळे जगाचा पोतही बदलू लागला आहे. त्यातून अस्थिरता वाढते आहे. वाढती अस्थिरता आणि संरक्षण हे परस्परपूरक शब्द आहेत. हे लक्षात घेता सर्वांनाच आपापल्या देशाच्या संरक्षणाकरिता सक्रिय रहावे लागेल. संरक्षणावरील तरतूद वाढवतानाच त्यामध्ये नवीन तंत्रज्ञानाचा वापर करणे, हेदेखील तितकेच महत्त्वाचे होय. भारताने नेहमीच 'वसुधैव कुटुंबकम' असा संदेश आपल्या कृतीतून दिला आहे. देश संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भर बनण्याचा प्रयत्न करीत असताना 'सिम्बायोसिस'सारख्या संस्थांमध्ये संरक्षण क्षेत्रातील नवा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. शिक्षणासोबत देश उभारणीचा हा संकल्प असून, नव्या युगातील संरक्षण उपकरणे येथील स्नातकच तयार करतील, असा विश्वासही राजनाथसिंह यांनी बोलून दाखवला आहे. यातून अशा प्रकारचे अभ्यासक्रम हे देशाकरिता किती महत्त्वाचे आहेत, हेच दिसते. मुळात संरक्षण क्षेत्र अधिकाधिक मजबूत करण्यासाठी आपल्याला अत्याधुनिक उपकरणे, यंत्रणा लागतील. त्याचबरोबर ही सर्व उपकरणे तयार करण्यासाठी कुशल मनुष्यबळाचीही तितकीच गरज असेल. संरक्षण क्षेत्रातील अभ्यासक्रमातून अशा प्रकारचे कुशल मनुष्यबळ सहज उत्पन्न होण्यास मदत मिळू शकते. सध्याची आपली दिशा बघता हा पल्ला आपण नक्कीच गाठू शकतो.

## पंतप्रधान मोदी २४ ऑक्टोबरला करणार प्रचाराचा शुभारंभ

दिल्ली । वृतसंस्था

**विधानसभा निवडणुकीला सामोऱ्या जाणाऱ्या बिहारमध्ये लवकरच प्रचाराची जोरदार धुमाळी सुरू होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सहभागामुळे त्या प्रचाराची रंगत आणखीच वाढेल. मोदी २४ ऑक्टोबरपासून सत्ताधारी एनडीएच्या आणि विशेषत: भाजपच्या प्रचार मोहिमेचा प्रारंभ करणार आहेत.**



बिहारमधील यावेळची निवडणूक अतिशय अटीतटीची ठरण्याची चिन्हे आहेत. सत्ता राखण्याचा निर्धार केलेल्या एनडीएने झंझावाती प्रचाराची आखणी केली आहे. त्यातून मोदींचा प्रचार कार्यक्रम निश्चित झाला आहे. त्याविषयीची माहिती भाजपचे प्रदेशाध्यक्ष दिलीप जयस्वाल यांनी रविवारी पत्रकार परिषदेत दिली. समस्तीपूरमध्ये येत्या शुक्रवारी होणाऱ्या सभेच्या माध्यमातून मोदी प्रचाराचा नारळ फोडतील. त्याच दिवशी त्यांची बेगुसरायमध्ये आणखी एक सभा होईल. त्यानंतर ३० ऑक्टोबरला मुझफ्फरपूर आणि छपरामध्ये मोदींच्या सभांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे चालू महिन्याच्या अखेरपर्यंत त्यांच्या बिहारमध्ये ४ सभा होतील. त्यानंतर २, ३, ६ आणि ७ नोव्हेंबरला मोदी प्रचारासाठी बिहारमध्ये असतील. त्या राज्यात २ टप्प्यांत विधानसभा निवडणूक होणार आहे. त्यासाठी ६ आणि ११ नोव्हेंबरला मतदान होईल.

## अभिनेत्री भाग्यश्री मोटे यांच्या हस्ते 'आष्टी वार्ताहर दीपोत्सव' अंकाचे प्रकाशन

मुंबई । प्रतिनिधी

**'लेखन शक्तीच्या गुणवत्तेवर समाज व्यवस्थेची भविष्यातील शाश्वत इमारत उभी असते. आष्टी वार्ताहर दीपोत्सव या दिवळी अंकाच्या माध्यमातून वाचकाला सर्वस्पर्शी ज्ञान मिळते.सर्व क्षेत्रावर खऱ्या अर्थाने आपल्या भारदस्त लेखणीच्या माध्यमातून नवा अध्याय निर्माण करणारा हा दिवाळी अंक सर्वस्पर्शी आणि सर्वव्यापी आहे. मी या दीवाळी अंकाची वाचक व हितचिंतक आहे.आष्टी वार्ताहर माझ्या जन्मभुमीतील ग्रामीण भागातील दर्जेदार व मोठी परंपरा लाभलेला सर्वस्पर्शी दीवाळी अंक असल्याचे प्रतिपादन आष्टीची सुकन्या व सुप्रसिद्ध अभिनेत्री भाग्यश्री मोटे हीने केले.**

मुंबई येथे शुक्रवारी मुंबई येथील गोरेगाव फिल्मसीटीत आष्टी वार्ताहर दीपोत्सव या दिवाळी अंकाचे प्रकाशन अभिनेत्री भाग्यश्री मोटे यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी तिने हे भाष्य केले. यावेळी संपादक उत्तम बोडखे,सेवानिवृत पीएसआय शेख अन्सारभाई,जेष्ठ पत्रकार रामदास जाधव,मुंबई पोलीस हनुमंत कावळे, आकाश डोंगरे, सत्यम यादव यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित



होते.आष्टी वार्ताहर दीपोत्सव २०२५ च्या मुखपृष्ठावर छायाचित्र असलेली अभिनेत्री भाग्यश्री मोटे यांच्याच हस्ते आज मुंबईत प्रकाशन झाले. समाजातील विविध क्षेत्रातील कलावंताना, साहित्यिकांच्या कलागुणांना शब्दबद्ध करत न्याय देण्याच्या भावनेतून गेली ३१ वर्षापासून दिवाळीनिमित्त वार्ताहरचा दीपोत्सव हा अंक वाचकांसाठी पर्वणी असतो.बीड जिल्ह्यातील आष्टी शहरातुन प्रकाशित होणारा आष्टी वार्ताहर 'दीपोत्सव' अंक सर्व क्षेत्रांना स्पर्श करणारा दर्जेदार दिवाळी अंक असल्याचे प्रतिपादन प्रसिध्द अभिनेत्री भाग्यश्री मोटे यांनी प्रकाशन सोहळ्यात बोलताना केले. मुंबई येथील गोरेगाव फिल्म सीटीमध्ये प्रकाशन सोहळ्यात त्या बोलत होत्या.आष्टी वार्ताहर दीपोत्सव हा दिवाळीनिमित्त प्रकाशित होत असलेला विशेषांक वाचनीय वाटला. राजकीय,सामाजिक,आर्थिक,धार्मिक, वैचारिक,सांस्कृतिक,शैक्षणिक आदींसह विविध क्षेत्रातील कलागुणांना या अंकाच्या माध्यमातून शब्दबद्ध करण्यात आले आहे असे सांगीतले.गुणी कलावंत , साहित्यिक यांना न्याय आणि सामाजीक बांधिलकीच्या माध्यमातून समाजसेवकांच्या कार्याला बळ देण्याचा प्रयत्न यातून करण्यात आला आहे.गेली ३० वर्षांपासून अविरत,सातत्यपूर्ण दिवाळी निमित्त वार्ताहर दीपोत्सव अंक हा वाचकांना दिला जातो.३० वर्षाची परंपरा असलेल्या जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे संपादित आष्टी वार्ताहर दिवाळी अंकात विशेष कव्हर स्टोरी,कथा, कविता,विविध विषयांवर लेख यांच्या व्यंगचित्र आहेत.३० वर्षाहुन अधिक परंपरा असलेला आष्टी वार्ताहर दिवाळी अंक हा सर्वसामान्यांच्या प्रश्नांना व्यक्त करत विविध क्षेत्रातील वेगळेपण जपणारा आहे. साहित्य लेखकांची यातील लेखणी गुणसंपन्न असल्याने बीड जिल्हावाशियांना ती पर्वणी ठरत आहे.या अंकाची मी वाचक व हितचिंतक असल्याचे मोटे हीने सांगितले.प्रारंभी अभिनेत्री भाग्यश्री मोटे हिचे सेवानिवृत पोलीस निरीक्षक शेख अन्सारभाई यांनी स्वागत केले तर आभार उत्तम बोडखे यांनी मानले.

## चिखली बँकेचा व्यवहार ठप्प

जालना । प्रतिनिधी

दि चिखली अर्बन को बँक लिमिटेड या बँकेअंतर्गत एकूण ३१ शाखा आहे परंतु या शाखेचे फोन पे गुगल पे एटीएम हे सर्व सुविधा दहा दिवसापासून बंद असल्यामुळे कोटी रुपयाचा व्यवहार ठप्प झाला आहे तसेच एटीएम मशीन नवीन आल्यापासून बंदच असल्याचे दिसून येत आहे परंतु या विषयावर बँकेचे जबाबदार अधिकारी कोणीही बोलायला तयार नाही याचं कारण काय आहे हे मात्र अजून समजू शकले नाही या बँकेअंतर्गत मोबाईल बँकिंगचे अंतर्गत वेळेची बचत होण्यासाठी फायदा होणार आहे असे पण एक चिखली बँकेच्या कॅलेंडर माध्यमातून कळविण्यात आलेले आहे तसेच या बँकेचे अंतर्गत शाखेतील मोबाईल बँकिंग साठी सर्व शाखेवर ग्राहकांना विशेष प्रशिक्षणाची व्यवस्थापन करण्यात आली आहे असे पण दिशाभूल करण्यासारखे प्रसिद्धी चिखली बँकेकडून करण्यात येत आहे सदरील चिखली बँक अंतर्गत मोठ्या प्रमाणात पैशाची उधळपट्टी करून एटीएम मशीन खरेदी करण्यात आली आहे परंतु त्याचा फायदा अद्याप पर्यंत कोणाला झाला नाही असे पण परिस्थिती समोर आली आहे. तसेच बंपर लोन धमाका अशी पण लालूच या बँकेमार्फत देण्यात येत आहे. दीपावलीच्या सणावर या चिखली बँकेचा व्यवहार ठप्प झाल्यामुळे खातेदारांमध्ये नाराज बघायला मिळत आहे. फोन पे व एटीएम मशीन सुरू होणार आहे का नाही याबाबत बँकेकडून कोणतीच माहिती दिल्या जात नाही असे पण बोलल्या जात आहे.

## पान ६ वरून...

### गटविकास अधिकारी

सदस्य, सरपंच,ग्रामसेवक व स्थानिक कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग घेतला सामाजिक बांधिलकी जपत ग्रामपंचायतींनी दिव्यांगाच्या आयुष्यात आनंदाची गोडी आणण्याचा प्रयत्न केला. गट विकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे यांनी सांगितले की,ग्रामपंचायतीने अशा समाजभिमुखम उपक्रमाद्वारे दिव्यांगाना आत्मसनमानाने जगण्याची प्रेरणा दिली आहे हा उपक्रम सर्व ग्रामपंचायत साठी आदर्श ठरला आहे. ग्रामपंचायती केवळ प्रशासनाच्या केंद्र नसून त्या समाज जीवनाचा हृदय स्पंदन आहेत दिव्यांगाच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणे म्हणजे खरी विकासाची दिशा या अनोख्या उपक्रमामुळे वडवणी तालुक्यातील दिव्यांग बांधवांची दिवाळी यंदा खऱ्या अर्थाने उजळून निघाली.

---------------

### बीड नगरपरिषद निवडणुकीत

अनेक सामाजिक, शैक्षणिक आणि लोककल्याणकारी उपक्रम राबवले असून त्यातून त्यांनी शिवसेनेचा विचार घराघरात पोहोचवला आहे. राजू महुवाले म्हणाले, मी आणि माझं कुटुंब हे पूर्णपणे शिवसेनेच्या विचारांवरब चालणारं आहे. पक्षाचा आदेश मिळाल्यास माझी पत्नी सौ. चंदाताई महुवाले या बीड नगरपरिषदेच्या अध्यक्षपदासाठी निवडणूक लढवणार. आम्ही दोघेही पक्षाच्या नेतृत्वावर विश्वास ठेवतो आणि जनतेच्या सेवेला समर्पित आहोत. शिवसेनेचा भगवा झेंडा नगरपरिषदेवर फडकवणे हेच आमचं ध्येय आहे.त्यांच्या या निर्णयाचे स्वागत बीड शहरातील अनेक शिवसैनिक आणि नागरिकांनी केले असून, आगामी निवडणुकीत महुवाले दांपत्याचा प्रभाव आणि संघटनात्मक ताकद निर्णायक ठरण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे.शहरातील शिवसैनिकांमध्ये यामुळे नवउत्साह निर्माण झाला असून, शहरासाठी कार्य करणारा प्रामाणिक, लोकाभिमुख आणि इमानदार चेहरा म्हणून राजू महुवाले यांच्याकडे पाहिले जात आहे.

---------------

### अभिनेते डॉ. महेश कुमार भारत

प्रयत्न नवीन फिल्म ची स्क्रिप्ट निवडताना असतो. बॉलिवूड मधूनही त्यांच्या या पुरोगामी विचारांचे स्वागत केले जात आहे. मुंबई येथील रायझिंग स्टार ऑफ इंडियन सिनेमा या संस्थेच्या वतीने चित्रपटात उल्लेखनीय अभिनय करणाऱ्या चित्रपट कलाकारांना दरवर्षी भारत राष्ट्र भूषण पुरस्कार दिला जातो. या वर्षीचा भारत राष्ट्र भूषण पुरस्काराने बीडचे भूमिपुत्र डॉ.महेश कुमार यांना सन्मानित केल्याबद्दल मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.संजय तांदळे यांनी त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला यावेळी लक्ष्मण चाटे, प्रा. बाळासाहेब नागरगोजे, पांडुरंग जायभाये, सुदाम कोळेकर, डॉ.लक्ष्मण पवळ आदी उपस्थित होते.

---------------

### आयुर्वेदामध्ये सोरायसिसवर

आराम मिळतो. हे पातळ औषध दररोज सायंकाळी गरम करून ज्या ठिकाणी खाज सुटते किंवा चट्टे येतात त्या ठिकाणी मसाज केली तर हा रोग पूर्णपणे बरा होऊ शकतो. असा दावा श्याम पाटील करतात. त्यांनी अनेक झाडांचा झाडपाला जमा करून आणि दुर्मिळ झाडांची मुळे शोधून आणून त्याची पावडर करून आणि त्यानंतर लिक्विड तयार करून ते रुग्णांना देतात. अनेक वर्षापासून त्रस्त असलेले रुग्ण त्यांच्याकडे दुर दुर वरुन येतात अनेकांचा या औषधामुळे सोरायसीस बरा झालेला असल्याचे रुग्ण सांगतात. त्यामुळे हा इलाज त्रस्त रुग्णांना दिलासा देणारा ठरवू लागला आहे .बीडमध्ये वास्तव्यात असलेले श्याम पाटील गेल्या अनेक वर्षापासून आयुर्वेदावर अभ्यास करतात. त्यांनी अनेक रोगांवर अऔषध शोधलेले आहे. मात्र सोरायसिस वर औषध शोधणे कठीण होते. त्यांनी प्रयत्नाची पराकाष्टा करून यावर औषध शोधले. अनेक जुन्या आयुर्वेदांचे पुस्तकांचा अभ्यास करून त्यातील संदर्भ काढून, ती समजून घेऊन अनेक झाडपाल्यापासून आणि मुळापासून हे औषध तयार केलेले आहे. ज्या रुग्णांना याचा त्रास असेल त्याचा हा त्रास पूर्णपणे बरा करून देण्याचा दावा श्याम पाटील करतात.बीड शहरातील संत सावता माळी चौक परिसरात राहणारे श्याम पाटील यांनी आतापर्यंत अनेकांचा हा रोग बरा केलेला आहे. बीड शहरातील अनेक रुग्ण त्यांनी बरे केलेले आहेत .याबरोबरच पंढरपूर, कोल्हापूर ,सोलापूर सारख्या ठिकाणाहूनही आलेले अनेक रुग्ण बरे झालेले आहेत. ज्यांना या रोगाचा त्रास आहे. त्यांनी श्याम पाटील यांच्याशी ९०२८८५९४७० या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधून आपला इलाज करायला हरकत नाही.

**मला चार दिवसात फरक पडला**

बीड शहरातील ढाकणे नामक व्यक्ती या रोगामुळे त्रस्त होते. त्यांनी अनेक ऍलोपॅथीची औषधे घेतली. मात्र हा रोग तात्पुरता बरा व्हायचा आणि पुन्हा उद्भवायचा. त्यांची श्याम पाटील यांच्याशी भेट झाली आणि त्यांच्याकडून त्यांनी औषध घेतले. अवघ्या चार दिवसांमध्ये त्यांना मोठ्या प्रमाणात आराम मिळाला. सध्या त्यांची ट्रीटमेंट चालू आहे. प्रत्यक्ष भेटीत त्यांनी मला आराम मिळाल्याचे सांगितले.

---------------

### नाम फाउंडेशन तर्फे बीड

या कामी पुढाकार घेतला. आज या ठिकाणच्या दोनशे शेतकऱ्यांना बियाण्याचे वाटप करण्यात आले यावेळी ॲड देशमुख यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले बियाणे पेरून चांगल्या प्रकारचे उत्पादन घ्यावे आणि नामचा उद्देश साध्य करावा, असे त्यांनी यावेळी म्हटले. तुषार पाटील यांनी देखील यावेळी मार्गदर्शन केले. गावातील जवळपास दोनशे शेतकरी त्याचबरोबर उपसरपंच देखील यावेळी उपस्थित होते.

---------------

### तळणीत सोयाबीन

प्रति क्विंटल ३८०० ते ४१०० रुपये असा समाधानकारक दर मिळत असून, परिसरातील शेतकरी वर्गात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रसंगी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे तालुका संघटक ज्ञानेश्वर (माऊली) सरकटे, शरद पाटील, सरपंच गौतम सदावर्ते, उपसरपंच विश्वनाथसिंग चंदेल, तंटामुक्ती समिती सदस्य रितेश चंदेल, गणेशराव कापकर, ह.भ.प. भगवान महाराज सरकटे, बाबुसिंग जनकवार, बबनसिंग चव्हाण, दत्तराव सरकटे, बंडू सरकटे, संजय मोरे, प्रविण सरकटे, सिध्देश्वर सरकटे आदींची उपस्थिती होती.

---------------

### घरफोडीचे सहा गुन्हे

ताब्यात देण्यात आले आहे. ही कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर ,स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार विकास राठोड, राहुल शिंदे ,अंकुश वर्पे, महेश जोगदंड, राजू पठाण, युनुस शेख, गोविंद राख ,पोलिस अंमलदार बबन सलगर, बप्पासाहेब घोडके, मनोज परजणे, अशपाक सय्यद, अक्षय नाईकनवरे ,विकी सुरवसे ,चालक पोलीस हवालदार गणेश मराडे, नितीन वडमारे, सुनील राठोड आदींनी केली.

## पान १ वरून...

### शासकीय सोयाबीन खरेदी केंद्र

पदरात उत्पादन खर्चाइतकाही दर मिळत नसल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने हमीदराने सोयाबीन खरेदी केल्यास शेतकऱ्यांना थोडाफार लाभ होऊ शकतो. गतवर्षी केंद्र सुरू करताना लक्षांक कमी ठेवण्यात आला होता. त्यामुळे शेतकऱ्यांना फारसा लाभ झाला नाही. यंदा उत्पादनच कमी असल्याने लक्षांक निश्चित करताना ते वाढीव असावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

------------

### १ नोव्हेंबर रोजी मुंबईत

नांदगावकर, माकपचे प्रकाश रेड्डी आणि काँग्रेसचे सचिन सावंत उपस्थित होते. यावेळी राऊत म्हणाले की, मतदार यादी घोटाळ्या बाबत निवडणूक आयोगा विरोधात आम्ही लढाई लढत आहोत. निवडणुकीचे मॅच फिक्सिंग झाले आहे. आमदार विलास भुरे असे म्हणाले की मी २० हजार मतदार बाहेरून आणले. मी दुबार लोकांचे नाव दिली पण काढले नाही, हे मंदा म्हात्रे यांचे महत्वाचे वाक्य आहे. संजय गायकवाड यांनी सांगितले आहे की, बुलढाण्यात १ लाख पेक्षा जास्त बोगस मतदार आहेत. आता यांना दणका द्यावा लागेल. रस्त्यावर द्यावे लागेल. यासाठी आता १ नोव्हेंबर निवडणूक आयोगाच्या कारभारावर मुंबईत एक विराट मोर्चा काढण्यात येईल. मतदार यादी घोळाबाबत आमची निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांबरोबर चर्चा झाल्या. अनेक उदाहरण आम्ही समोर दिली. निवडणूक आयोगाने उत्तर देणे अपेक्षा होते. मात्र त्यांचे उत्तर समाधानकारक नाही. त्यामुळेच आता सर्वपक्षीय मोर्चा काढण्याचा निर्णय झाला आहे. मतदार यादीत चुकीच्या वाटेने लोक घुसवले आहेत. लोकशाहीला धक्का पोहोचवण्याचे काम ज्यांच्याकडून होत असून त्यांच्या विरोधात हा मोर्चा आहे. पारदर्शकता हेच लोकशीचे मर्म आहे. बऱ्याच गोष्टी निवडून आयोग लपवत आहे. आता १ नोव्हेंबर रोजी आयोजित मोर्चात नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहनही राऊत यांनी केले. मतदान चोरीबाबत राहुल गांधी यांनी यापूर्वीही सांगितलेले आहे. आता महाराष्ट्रात निवडणूक आयोगाने विरोधी पक्षांच्या नेत्यांची मागणी मान्य केलेली नाही. निवडणूक आयोगाने हात झटकले आहेत. जी यादी केली आहे त्यात घोळ आहे. आम्हाला ती यादी प्राप्त झाली नाही. आदर्श प्रक्रिया राबवली जात नाही, असे काँग्रेसचे प्रवक्ते सचिन सावंत यांनी सांगितले. मतदार यादीतील घोटाळा मोठा आहे. सामान्य लोकांना विश्वास निर्माण होण्यासाठी निवडणूक आयोगाची विश्वासार्हता राहिली पाहिजे. आता आम्ही १ नोव्हेंबरला मोर्चा काढून पुन्हा एकदा आमच्या मागण्या मांडणार आहोत, अशी माहिती मनसे नेते बाळा नांदगावकर यांनी दिली. मतदार यादी पारदर्शिक असणे अपेक्षित आहे. यामध्ये सुधारणा केली पाहिजे. याबाबत आम्ही दोनवेळा निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांची भेटही घेतली. जो खुलासा करण्यात आला तो खोटा आहे. आम्ही सांगितले त्यात सुधारणा झाली पाहिजे. मतदार यादीचा मुद्दा प्राथमिक आहे. आम्ही आमची तीव्र भावना दाखवण्यासाठी हा मोर्चा काढणार आहोत, अशी माहिती माकपचे प्रकाश रेड्डी यांनी यावेळी दिली.

------------

### राज्यात ९६ लाख बोगस

निवडून आले तरी जल्लोष नाही. कारण निवडून आलेले आमदारही आवाक झाले. त्यांनाही कळेना आपण कसे निवडून आलो. कारण सारे काही फिक्स होते. नरेंद्र मोदी हे गुजरातचे मुख्यमंत्री असतानाच्या भाषणाचा व्हिडिओही राज ठाकरे यांनी दाखवला. त्यावेळीही नरेंद्र मोदी हे निवडणूक आयोगला म्हणत होते की, तुम्ही सत्ताधाऱ्यांचे गुलाम नाही. आम्हीही आता तेच सांगतोय. सत्ताधारी आमदार स्वतः सांगतो मी बाहेरून वीस हजार लोकांचे मतदान आणले, असे सांगत त्यांनी भुमरे यांचाच व्हिडिओ दाखवला. ते महाराष्ट्रातील मतदारांचा अपमान करत आहेत, असेही राज ठाकरे म्हणाले. बोगस मतदार भरलेले आहेत, असे सत्ताधारी पक्षाचे आमदार सांगत आहेत. सगळीकडेच आम्हाला केवळ सत्ता पाहिजे आहे म्हणून सर्व काही सुरु आहे, असा आरोप करत भाजपला जी मराठी माणसे मतदान करतात त्यांना सांगायचे आहे की, वरवंटा फिरवू द्यायचे नाही नाहीतर त्या वरवंट्याखाली तुम्हालाही घेतील. मी प्रगतीच्या आड नाही मात्र मुंबई, महाराष्ट्रात होणारी प्रगती मराठी माणसाच्या थडग्यावर होतं असेल तर मी होऊ देणार नाही, असा इशाराही राज ठाकरे यांनी दिला. जोपर्यंत मतदान यादीमधील घोळ संपत नाही तोपर्यंत मतदान घेवू नका, असे माझे निवडणूक आयोगाला सांगणे आहे. आता प्रत्येकाने कुठे कुठे जायचे आहे ते योग्य वेळ आली की सांगणार, असेही राज ठाकरे यांनी पदाधिकाऱ्यांना सांगितले.

------------

### अंबडमधील बीअरबारमध्ये

होत असल्याचे बोलल्या जात आहे. याप्रकरणी मयताच्या नातेवाईकाने पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हा दाखल करण्यासंदर्भात मागणी करण्यात आली पोलिसांनी आश्वासन दिल्यामुळे मयताच्या नातेवाईकांनी आज दुपारी मयतावर अंत्यसंस्कार करण्यात आले. सदरील घटनेचा तपास करून योग्य ती कारवाई करण्यात येईल. पुढील तपास श्री कुटे हे करीत आहे.

------------

### जरांगेंचा खटाटोप राजकीय

मूळ ओबीसी कसा टिकेल?, असा सवाल हाकेंनी मुख्यमंत्र्यांना विचारला आहे. आम्ही वारंवार सांगतोय जरांगे फक्त मुखवटा आहे. त्यांच्या आडून मराठा राजकीय नेते, आमदार, खासदार, कारखानदार त्यांचा हेतू साध्य करत आहेत. प्रस्थापित मराठा समाजाला सरपंचपदापासून ते मुख्यमंत्री पदापर्यंत सर्व पदे स्वतःकडे ठेवायची आहेत. गरजवंत मराठ्यांच्या शिक्षण आणि नोकरीशी जरांगेला देणे घेणे नाही. ईडब्लुएसच्या कटऑफचा फरक ओबीसींपेक्षा १५ ते २० गुणांनी कमी आहे. त्यामुळे गजरवंतांची शेकडो लेकरेबाळे पायावर उभारली असती. त्यांचे आयुष्य जरांगे व त्यांच्या आकांनी उद्ध्वस्त केले आहे. आम्ही ओबीसी बांधव आतडी तुटोसतर ओरडून सांगतोय. बलूता अलुता सामाजिक मागास यांच्या स्पर्धेत कसा टिकेल हो, अशी केविलवाणी हाक पत्राच्या माध्यमातून हाकेंनी मुख्यमंत्र्यांना दिली आहे.

---------------

### पळून जाणाऱ्या मुलींच्या बाबतीत

विचार करतात, त्यांना मारहाण करून सुधारले पाहिजे. पालकांनी आपले मन बळकट करावे. जर तुमची मुलगी तुमचे ऐकत नसेल आणि दुसऱ्या धर्माच्या मुलासोबत जाण्याचा विचार करत असेल, तर तिचे पाय तोडून टाका. अशा वेळी तुमचे हात थरथरता कामा नयेत. त्यांनी पुढे म्हटले की, ज्या मुली संस्कारांचा आदर करत नाहीत, त्यांना अशीच शिक्षा दिली पाहिजे. साध्वी प्रज्ञासिंह यांचे हे विधान सोशल मीडियावर व्हायरल झाले असून, त्यावरून तीव्र टीका होत आहे. त्यांच्या या वक्तव्याने हिंसाचाराला प्रोत्साहन देण्याचा आणि मुलींच्या स्वातंत्र्यावर गदा आणण्याचा आरोप होत आहे. विशेषतः, दुसऱ्या धर्माच्या मुलांसोबत जाणाऱ्या मुलींचे पाय तोडण्याचे विधान अत्यंत आक्षेपार्ह मानले जात आहे. यापूर्वीही साध्वी प्रज्ञासिंह यांनी अनेक वादग्रस्त वक्तव्ये केली असून, त्यामुळे त्या नेहमीच चर्चेत राहिल्या आहेत.

----------

### परळीमधुन अमृत भारत एक्सप्रेस

परळी वैजनाथ हे रेल्वे विभागाला मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळवून देणारे रेल्वे स्थानक असून पुणे आणि मुंबईसाठी नियमित ये-जा करणारे अनेक प्रवासी, तसेच वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या दर्शनासाठी येणारे व जाणारे लाखो भाविक परळी रेल्वे स्थानकातून प्रवास करतात. मात्र परळी वरून थेट मुंबईला जाण्यासाठी रेल्वे गाडी उपलब्ध नसल्याने ही मागणी करण्यात आल्याची समजते. त्याचबरोबर परळी वैद्यनाथ येथून नाशिककडे जाताना औंढा नागनाथ, घृष्णेश्वर, त्र्यंबकेश्वर या ज्योतिर्लिंगांना जोडणारी ज्योतिर्लिंग एक्सप्रेस ही विशेष गाडी सुरू करण्याची ही मागणी धनंजय मुंडे यांनी पत्राद्वारे केली आहे. गणेशोत्सव दिवाळी त्याचबरोबर महाशिवरात्री अशा विविध क्षणोत्सवांच्या काळामध्ये विशेष फेस्टिवल एक्सप्रेस देखील सुरू करण्याची मागणी धनंजय मुंडे यांनी पत्राद्वारे केली आहे.

---------

### चावीवाल्यानेच मारला

आणि तिथून पळ काढला. घटनेची माहिती मिळताच पांडुरंग लोखंडे यांनी शनिवारी (दि. १८) ऑक्टोबर रोजी परळी शहर पोलीस ठाण्यात तातडीने तक्रार दाखल केली. परळी शहर पोलिसांनी या गुन्ह्याची तात्काळ आणि गांभीर्याने दखल घेत, चक्र फिरवली. अवघ्या काही तासांच्या आतच, खाक्या दाखवत आरोपी बबूलू चावीवाला याच्या मुसक्या आवळल्या! विश्वासाला तडा देणाऱ्या या चोरट्याला पोलिसांनी पकडल्याने लोखंडे कुटुंबीयांना दिलासा मिळाला आहे, तर पोलिसांच्या या झंझावाती कारवाईमुळे शहरात एक कडक संदेश पोहोचला आहे.

----------

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार दि.२० ऑक्टोबर २०२५
३

## परळी नगर परिषदेतील इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती

परळी

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचे बिगुल वाजले असून, परळी वैजनाथ येथील नगरपरिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून लढण्यासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांची माजी मंत्री आ. धनंजय मुंडे हे सोमवार आणि मंगळवार असे दोन दिवस मुलाखती घेणार आहेत.सोमवारी (ता.२०) सकाळी अकरा वाजल्यापासून सायंकाळी पाच वाजेपर्यंत वॉर्ड क्रमांक एक ते आठ मधील इच्छुक उमेदवारांच्या तर उर्वरित वॉर्डातील इच्छुकांच्या मंगळवारी अकरा ते पाच या वेळेत मुलाखती घेणार आहेत. या सर्व मुलाखती परळी शहरातील नवीन विशेष शासकीय विश्रामगृह या ठिकाणी होणार असून, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख पदाधिकारी यावेळी उपस्थित राहतील. दरम्यान मागील बऱ्याच वर्षांपासून ही नगर परिषद एकहाती धनंजय मुंडे यांच्या ताब्यात राहिलेली असून, गेल्या जवळपास चार वर्षांपासून प्रशासक कार्यरत आहेत.

# बीड शहराची सांस्कृतिक ओळख जपण्यासाठी आम्ही कटिबद्ध : डॉ.योगेश क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

बीड शहराची सांस्कृतिक ओळख जपण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. गणेश मंडळांनी सामाजिक जाणिवा जाग्या करणारे देखावे साकारून एक वेगळी परंपरा निर्माण केली आहे. ही परंपरा अधिक भक्कम करण्यासाठी यापुढे गणेश मंडळांना सर्वतोपरी सहकार्य करू, अशी ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व 'कल्पतरू प्रतिष्ठान'च्या पुढाकारातून उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ देखावा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. मात्र गणेशोत्सवानंतर पितृपक्ष, अतिवृष्टी व दुःखद घटनांमुळे बक्षीस वितरण समारंभ रखडला होता. अखेर शनिवारी (दि.१८) सौ.के.एस.के. महाविद्यालयाच्या सभागृहात पार पडलेल्या कार्यक्रमात विजेत्या मंडळांचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाला कल्पतरू प्रतिष्ठानच्या सचिव डॉ.सारिकाताई क्षीरसागर, गणेश वाघमारे, सुभाष क्षीरसागर, शुभम धूत, प्रेम चांदणे, शुभम कातांगळे, नितीन साखरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

परीक्षक म्हणून प्रा.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, प्रा.संजय पाटील देवळाणकर, प्रा.सारंग वाघमारे, फामजी पारीख, विद्याभूषण बेदरकर, नागेश शेटे यांनी काम पाहिले. शुभम धूत यांच्यासह गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांमधून शुभम जोशी, मुकेश शिवगण, भाग्येश कुलकर्णी आदींनी मनोगत व्यक्त केले. पुढे बोलताना डॉ. योगेश क्षीरसागर म्हणाले, गणेशोत्सव हा केवळ धार्मिक सोहळा नसून सामाजिक जागरूकतेचे प्रभावी व्यासपीठ आहे. बीड शहराची सांस्कृतिक ओळख जपण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. यंदा डीजे वापरास परवानगी मिळवण्यासाठी आम्ही स्वतः पालकमंत्री व पोलिस अधीक्षकांशी चर्चा केली होती, त्यानंतर प्रशासनाने सहकार्य केले.



### दोन गणेश मंडळांनी बक्षिसाची रक्कम दिली पूरग्रस्तांच्या मदतीसाठी

स्वराज्य युवक गणेश मंडळाच्यावतीने बक्षिसाची रक्कम ७,५०० रुपये तर वीरशैव गणेश मंडळाच्यावतीने २५ हजार रुपये पूरग्रस्तांना मदत देण्यात आली. गणेश मंडळांनी सामाजिक बांधिलकी जोपासल्याबद्दल डॉ.योगेश क्षीरसागर यांनी कौतुक केले.

### गणेश मंडळांना लाखांची पारितोषिके

नवरंग गणेश मंडळ व न्यू गणेश मंडळास प्रत्येकी १ लाख रुपये असे प्रथम बक्षीस मिळाले. दत्तात्रय गणेश मंडळास द्वितीय बक्षीस ५१ हजार रुपये, वीरशैव गणेश मंडळास तृतीय बक्षीस २५ हजार रुपये, मनोकामना गणेश मंडळास चतुर्थ बक्षीस २५ हजार रुपयांचे मिळाले. तसेच, आझाद हिंद गणेश मंडळ, राजे संभाजी गणेश मंडळ, सिद्धिविनायक गणेश मंडळ, स्वराज्य गणेश मंडळ, जय मातादी मित्र मंडळ, रामायण गणेश मंडळ, माऊली गणेश मंडळ, कोरडे गणपती गणेश मंडळ, जय हनुमान गणेश मंडळ, विघ्नहर्ता गणेश मंडळ, न्यू समर्थ गणेश मंडळ, राष्ट्रीय गणेश मंडळ, पुरणदास गणेश मंडळ, ओझार गणेश मंडळ व मृत्युंजय गणेश मंडळ या गणेश मंडळांना उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले.

पुढील वर्षी बक्षिसांची रक्कम अधिक वाढवली जाईल, असे डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले. डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांनी प्रास्ताविक केले. तर प्रा.संजय पाटील देवळाणकर यांनी सूत्रसंचलन केले. यावेळी गणेश मंडळांचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

# आळ्या किडे असलेले धान्य रेशन दुकानातून वितरीत

### पुरवठा विभागातील प्रकार,निष्कृष्ट धान्यामुळे जीवीतास धोका





वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तहसील पुरवठा विभागामार्फत दिवाळीला राशन दुकानातुन आळ्या मस कीडे धूळ असलेले अत्यंत निष्कृष्ट दर्जाचे धान्य सध्या वितरित केले जात आहे.तालुक्यातील चिखल बीड येथील राशन दुकानातले धान्य घेऊन काही लाभार्थी हे थेट वडवणी तहसील कार्यालयातच हे निष्कृष्ट धान्य घेऊन पोहोचले खुद्द तहसिलदारांनाच धान्यामधील अळ्या किडे दाखवले असे असताना देखील तालुक्यामध्ये दिवाळीनिमित्त सर्वत्र निष्कृष्ट दर्जाचे धान्य वितरित केले जात असून हे धान्य खाऊन एखाद्याचा जीव गेल्यावरच पुरवठा विभागाला जाग येणार आहे का असा सवाल नागरीक विचारू लागले आहेत.

निष्कृष्ट दर्जाचे धान्याचे वितरण तात्काळ बंद करून चांगल्या स्वरूपाचे धान्य देण्याची मागणी लाभार्थी करू लागले आहेत तसेच तालुक्यातील अनेक राशन दुकानदार हे दोन दोन महिने राशन देत नसल्याची ही तक्रार लाभार्थ्यांनी केली आहे तसेच धान्य घेतल्या नंतर राशन दुकानदारांकडून पावती दिली जात नाही तसेच कमी धान्य दिले जात असल्याचे निवेदन तहसीलदारांना देण्यात आले आहे.

सध्या वडवणी तालुक्यातील राशन दुकानावर अत्यंत निकृष्ट दर्जाचे राशन लाभार्थ्यांना दिले जात आहे यामध्ये आळ्या मसकीडे जाळ्या धुळ आहेत हे धान्य खाल्ल्यामुळे नागरिकांच्या जीवास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे त्यामुळे निकृष्ट दर्जाचे वितरण होणारे धान्य त्वरित बंद करावे अन्यथा लवकरच आंदोलन करू

प्रकाश उजगरे, सामाजिक कार्यकर्ते

# वाचनाने माणूस घडतो-प्राचार्य डॉ. सरकटे

गढी । प्रतिनिधी

**जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे श्री.शिवाजीराव पंडित कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर गढी येथे ग्रंथालय विभागाच्या वतीने भारतरत्न महामहीम डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांची जयंती ''वाचन प्रेरणा दिन' म्हणून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून वाणिज्य विभागाचे प्रा.श्रीकिसन लोणकर तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे पाचार्य डॉ सदाशिव सरकटे हे उपस्थित होते, सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.**

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना प्रा. श्रीकिसन लोणकर यांनी असे प्रतिपादन केले की १५ ऑक्टोबर हा दिवस भारतभर ''वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. डॉ. कलम साहेबाचे स्वप्न होते कि माझा जन्मदिवस साजरा करताना तो इतराप्रमाणे साजरा न करता वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करावा. डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांचा जन्म तामिळनाडू राज्यातील रामेश्वरम येथे एका सर्वसाधारण मुस्लीम कुटुंबातब झाला. त्यांचे बालपण फार कठीण परिस्थितीत गेले. परंतु त्यांनी शिक्षणाची कास कधी सोडली नाही. त्यांच्या शिक्षणासाठी त्यांच्या बहिणीने स्वताचे दागिने दिले आणि त्यांना शिकविले. त्यांनी फिजिक्स व एरोनाटिक्समध्ये अभियांत्रीकीचे शिक्षण घेतले. चार दशके त्यांनी शास्त्रज्ञ म्हणून काम केले. त्यांना भारतामध्ये मिसाईल मॅन म्हणून ओळखले जाते. त्यांची भारताचे ११ वे राष्ट्रपती म्हणून निवड झाली. भारत सरकारने १९९७ मध्ये भारतरत्न हा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान करून गौरविण्यात आले. कार्क्रामाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सदाशिव सरकटे सर यांनी आपल्या मनोगतामध्ये जो माणूस पुस्तक वाचतो कुणापुढे कधीही नतमस्तक होत नाही असे सांगितले तसेच माणसाने दररोज काहीतरी वाचले पाहिजे म्हणूनच म्हटले जाते वाचाल तर वाचाल. आजकालची पिढी वाचन कमी करताना दिसते त्यांचा जास्तीत जास्त वेळ मोबाईलमध्ये जातो परंतु वॉट्सअप, चॅटजीपीटी अशा प्रकारचे वाचन करून आपणाला परिपूर्ण असे ज्ञान मिळत नाही म्हणून आपण पुस्तके वाचली पाहिजेत पुस्तक वाचनाने माणूस प्रगल्भ होतो. विचार प्रगल्भ होतात माणसाने कथा, कादंबरी, चरित्र अ्शा प्रकारची पुस्तकं वाचली पाहिजेत. जी माणसं समाजामध्ये आज आपण मोठी झालेली पाहतो त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, पंडित नेहरू, या व्यक्तीने प्रदर्घ अशा प्रकारचं वाचन केलं. विद्यर्थयानी वाचलं पाहिजे नियमित महाविद्यालयामध्ये येऊन ग्रंथालयामध्ये आपला वेळ घालवला पाहिजे. जो विद्यर्थी महाविद्यालयामध्ये येऊन नियमित वाचन करतो तो विद्यर्थी कधीच बेकार राहू शकत नाही. यासाठी हा ''वाचन प्रेरणा दिन' ग्रंथालयाच्या वतीने साजरा करण्यात आला. डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम याच्यासाठी हीच खरी आदरांजली.ग्रंथालये ही माणसाची ज्ञानस्त्रोत केंद्रे आहेत, ती अधिक विकसित, व्यापक झाली पाहिजेत. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ.महारुद्र गव्हाणे यांनी केले. त्यांनी त्यांच्या प्रास्ताविकेमध्ये डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या विषयीची माहिती सांगितली . कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री.श्याम राऊत यांनी केले तर आभार श्री वक्ते यांनी मानले. या कायंक्रमासाठी शिक्षक, शिक्षेकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# लायन्स क्लब परतूर व दृष्टी लायन्स नेत्रालय तर्फे स्वच्छता कर्मचाऱ्यांचा दिवाळीपूर्व सत्कार





मंठा । प्रतिनिधी

**लायन्स क्लब ऑफ दृष्टी लायन्स नेत्रालय, परतूर-जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आज परतूर नगरपालिकेतील स्वच्छता कर्मचारी बांधवांचा दिवाळी निमित्त सन्मान करण्यात आला. या प्रसंगी स्वच्छता कर्मचाऱ्यांना कपडे व फराळाचे वाटप करण्यात आले.**

या उपक्रमाचा उद्देश शहराच्या स्वच्छतेसाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या कर्मचाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हा होता. आपल्या श्रमांमुळे शहर स्वच्छ, सुंदर आणि निरोगी राहते, त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले. ''आपल्या मेहनतीचा आदर आणि मान ठेवणे हेच आमचे ध्येय आहे,'' असे लायन्स क्लबच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लायन अतुल लड्डा होते. प्रमुख उपस्थितीत लायन परमेश्वर राजबिंडे, मनोहर खालापुरे, प्रवीण जेथलिया, महेश होलाणी, विश्वंभर दहिवाल, प्रशांत मसलकर, गणेश बोराडे, लक्ष्मीकांत बहिवाल, भानुदास कदम, शिल्पा होलाणी, संजीवनी खालापुरे, रोहिणी बहिवाल, सुनिता बोराडे तसेच नगरपरिषदेचे स्वच्छता कर्मचारी व इतर लायन्स सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी लायन्स क्लब परतूरचे ज्येष्ठ सदस्य स्व. भास्करराव खोसे यांच्या अल्पशा आजारानंतर झालेल्या निधनाबद्दल श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व लायन्स सदस्यांनी एकत्रितपणे परिश्रम घेतले.

# स्पा सेंटरच्या आडून अश्लील व्यवसाय-सोमेश कदम

बीड । प्रतिनिधी

**बीड शहरामध्ये स्पा सेंटरच्या आडून अश्लील व अनैतिक प्रकार सुरू असल्याचे धक्कादायक प्रकार उघड होत आहेत. या स्पा सेंटरमध्ये अवाजवी दराने पैसे घेऊन बेकायदेशीर व्यवसाय सुरू असून, याचा थेट परिणाम तरुण पिढीच्या मानसिक व सामाजिक आयुष्यावर होत असल्याचा गंभीर आरोप मनसेचे जिल्हा सचिव सोमेश कदम यांनी केला आहे.**

या संदर्भात त्यांनी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक बीड यांना पत्राद्वारे निवेदन देणार असून, शहरातील सर्व स्पा सेंटरची प्रत्यक्ष पाहणी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करणार असल्याचे म्हणलं आहे. या प्रकारांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असून, काही ठिकाणी पोलिस प्रशासनाचीही संमती असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पुढे दिलेल्या पत्रकात त्यांनी म्हंटले आहे की ''जर मनसेच्या नजरेत कोणतेही बोगस कृत्य करणारे स्पा सेंटर सापडले, तर त्यावर मनसे स्टाईलने कारवाई केली जाईल, असा इशारा सोमेश कदम यांनी पत्रकारा द्वारे दिला आहे. लवकरच मनसे शिष्टमंडळ जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांची भेट घेऊन याबाबत अधिकृत निवेदन देणार असल्याचेही त्यांनी सांगितले. बीडमधील वाढत्या अश्लील प्रकारांमुळे शहराची प्रतिमा मलिन होत असून, तरुण पिढीचे भवितव्यही धोक्यात येत आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने याची दखल घेऊन संबंधित स्पा सेंटरवर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी मनसेकडून करण्यात येत आहे.

## शार्दुलेश्वर शिक्षण संस्थेकडून मुख्यमंत्री सहाय्यता निधीस एक लाखाची मदत

**माजलगाव। प्रतिनिधी**

शिक्षण क्षेत्रात आदर्श ठरलेली शार्दुलेश्वर शिक्षण संस्था, माजलगाव ही संस्था सामाजिक बांधिलकी जोपासत आहे. संस्थेने शिक्षणाबरोबरच शेतकऱ्यांच्या अडचणींमध्ये नेहमीच पुढाकार घेत बी-बियाणे, खते, विहिरी खोदकाम तसेच कृषी संशोधनासाठी विविध प्रकारे मदत केली आहे. राज्य शासनाने सर्व कर्मचाऱ्यांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी एक दिवसाचा पगार देण्याचे आवाहन केले असताना, शार्दुलेश्वर शिक्षण संस्थेच्या सर्व कर्मचाऱ्यांनी त्या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत एकूण चार लाख रुपये मुख्यमंत्री सहाय्यता निधीस अर्पण केले होते. यानंतरही संस्थेच्या कर्मचाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने अतिरिक्त एक लाख रुपयांचा निधी मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाला सुपूर्द केला आहे.

# येडेश्वरीमुळे शेतकरी आनंदी असल्याचे पाहून समाधान वाटते

### खा.बजरंग सोनवणे यांचे प्रतिपादन, येडेश्वरी कारखान्याचे बॉयलर अग्निप्रदीपन

बीड । प्रतिनिधी

**पुर्वी ऊसउत्पादकांना आपला ऊस घेवून जाण्यासाठी कारखानदारांकडे चकरा माराव्या लागत. हे बंद करण्यासाठी शेतकरी केंद्रबिंदू माणून आपण येडेश्वरी साखर कारखान्याच्या उभारणीचा निर्णय घेतला. यानंतर हा कारखाना हळूहळू मोठा केला. आज या कारखान्यामुळे शेतकऱ्यांना आपला ऊस घेवून जाण्यासाठी कुठेही जावे लागत नाही, आणि ऊसदरही अपेक्षित मिळत आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसतो, हाच आनंद पाहून आपल्याला समाधानी वाटते, असे प्रतिपादन खा.बजरंग सोनवणे यांनी केले.**



येडेश्वरी साखर कारखाना लि.आनंदगाव सा.युनिट नं.१ चा १२ वा बॉयलर अग्निप्रदीपन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत बॉयलर अग्निप्रदीपन करण्यात आले. यावेळी पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, मागच्या काही वर्षांपुर्वी शेतकऱ्यांना कारखान्याची गरज होती. आता कारखान्याला शेतकऱ्यांची गरज आहे. साखर कारखाना हा तीन चाकी रिक्षा आहे. यातील एक चाक म्हणजे ऊसउत्पादक, दुसरे चाक ऊसतोड मजूर आहे तर तिसरे चाक हे कारखान्यातील कर्मचारी आहेत. यातील एक चाक जरी रस्त्यावरून घसरले तर जिल्ह्यात अनेक कारखान्याचे काय झाले?, हे आपण पाहत आहोत. कारखानदारी आता सोपी राहिलेली नाही. कारखाना चालविताना समन्वय असणे आवश्यक आहे. आपण शेतकरी केंद्रबिंदू मानून कारखान्याची उभारणी केली. त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलावे, त्यांचे प्रपंच उभा रहावे, असा उद्देश कारखाना उभारणी करताना ठेवलेला आहे. उसउत्पादक, ऊसतोड मजूर यांना जपण्याचे काम केले आहेच पण कारखान्यातील कर्मचाऱ्यांना देखील कधीही नाराज केलेले नाही. या वर्षी त्यांच्यासाठी चांगली वेतन वाढ करण्यात आलेली आहे. यामुळे कर्मचारी खूष आहेत. हा कारखाना दरवर्षीपेक्षा यावेळी अधिक उस गाळप करण्याचा प्रयत्न करेल. शेतकऱ्यांचा संपूर्ण ऊस घेवून जाण्यासाठी प्रयत्न करेल. आपला कारखाना अडीच हजार टनवरून आठ हजार कॅपीसीटीपर्यंत गेला आहे. कारखान्याच्या माध्यमातून अनेक प्रकल्प तयार केले आहेत. यातून लोकांच्या हाताला रोजगार मिळाला आहे. यावर्षी उत्तम पध्दतीने कारखाना चालवला जाईल. आपण सर्वांनी हा कारखाना आपला आहे, असे समजूनच काम करावे, असे अवाहनही त्यांनी यावेळी कर्मचाऱ्यांना केले. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या उप प्रदेशाध्यक्षा संगीता ठोंबरे, मा.आ.पृथ्वीराज साठे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे पदवीधर संघाचे प्रदेशाध्यक्ष डॉ.नरेंद्र काळे, येडेश्वरी साखर कारखान्याचे संचालक बाळकृष्ण भवर, सारिका बजरंग सोनवणे, सौरव सोनवणे यांच्यासह पंचक्रोशीतील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन, व्हा.चेअरमन, संचालक, कार्यकर्ते, येडेश्वरी साखर कारखान्याचे संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकनेते गोपीनाथ मुंडेंच्या स्मरणार्थ निराधार कुटुंबाना फराळाचे वाटप



माजलगाव । प्रतिनिधी

मागील नऊ वर्षांपासून लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या स्मरणार्थ दरवर्षी प्रमाणे याही वर्षी दि १९ ऑक्टोंबर रविवार रोजी अंध अपंग निराधार कुटुंबाला दिवाळी निमित्त फराळाचे वाटप भारतीय जनता पार्टीचे नेते तथा भाजपा भटक्या विमुक्त आघाडीचे प्रदेश सचिव ज्ञानेश्वर ( माऊली ) सरवदे,लुखेगावचे माजी सरपंच खयुम पठान,शरद पवार ओबीसी जिल्हा अध्यक्ष विलास नेमाने यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.या कार्यक्रमाचे आयोजन लोकनेते गोपीनाथ मुंडे अखंड पाणपोईचे अध्यक्ष तात्या पांचाळ यांनी केले होते.

# कर्जमुक्ती, वाढीव भरपाईसाठी बुधवारी गावोगावी आंदोलने

पुणे : सोयाबीनला केंद्र सरकारने ५३२८ रुपये हमीभाव जाहीर केला. मात्र अद्याप एकही सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करण्यात आलेले नाही. निवडणुकीत कर्जमाफीची घोषणा केली. मात्र आपत्तीच्या पार्श्वभूमीवर सुद्धा कर्जमाफी केली नाही. शेतकऱ्यांच्या या प्रश्नावर पाडव्याच्या दिवशी बुधवारी (दि. २२) राज्यभर गावोगावी आंदोलन करण्याचा निर्णय किसान सभेच्या राज्यस्तरीय कार्यशाळेत घेण्यात आला आहे.

अतिवृष्टीमुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. या कठीण काळात प्रश्न गंभीर झाले असून, या प्रश्नांवर तीव्र लढा देण्यासाठी अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने नाशिक येथे दोन दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी राज्यभरातील २३ जिल्ह्यांतील २०० हून अधिक निवडक शेतकरी कार्यकर्ते सहभागी झाले आहेत. गुरुवार, शुक्रवारी (ता.१६, १७) झालेल्या कार्यशाळेत किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अशोक ढवळे, राज्य उपाध्यक्ष माजी आमदार जे. पी. गावित, राज्य सरचिटणीस डॉ. अजित नवले,




राज्य अध्यक्ष उमेश देशमुख, राज्य उपाध्यक्ष सुनील मालुसरे आदी सहभागी झाले होते. या कार्यशाळेत राज्यव्यापी लढा अधिक व्यापक करण्यासाठी महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. राज्य सरकारने अतिवृष्टिग्रस्तांना जाहीर केलेले पॅकेज ३१,६०० कोटींचे असल्याचे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात जुन्याच अनेक योजनांची बेरीज करून सरकारने हा आकडा फुगविला आहे. प्रत्यक्षात केवळ ६,५०० कोटी इतकीच रक्कम सरकारने नव्याने दिलेली आहे. शेतकरी कर्जमुक्तीचे दिलेले आश्वासनही सरकारने पाळलेले नाही. शेतकऱ्यांचा यामुळे मोठा विश्वासघात झाला आहे. दीपावलीनंतर या प्रश्नावर मोठे राज्यव्यापी आंदोलन उभे करण्याचा निर्णय किसान सभेने घेतला आहे.

विविध मागण्यांसाठी सोयाबीन ओतून आंदोलन करणार : अतिवृष्टीने शेतकऱ्यांच्या झालेल्या पिकांच्या नुकसानीला भरपाईत वाढ करून किमान ५० हजार रुपये प्रति एकरी मदत द्या, शेतमजुरांचा रोजगार बुडाल्यामुळे त्यांना भरपाई म्हणून ३० हजार रुपये द्या, शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्जमाफ करा, शेतकऱ्यांचे होत असलेले जमीन अधिग्रहण तातडीने बंद करा, कसत असलेल्या जमिनी शेतकऱ्यांच्या नावे करा, पीकविमा योजनेचे रद्द केलेले ट्रिगर पुन्हा सुरू करा आदी मागण्यांसाठी किसान सभेचे आंदोलन तीव्र करण्यात येणार आहे. बुधवारी गावच्या चावडीवर सोयाबीन ओतून आंदोलन करण्यात येणार आहे.

## पावसाळा संपताच फळबागांना करून घ्या काव पेस्ट

यंदा भरपूर पाऊस झाल्याने शेतकरी चिंतेत आहेत. ज्यांच्या फळबागा आहेत त्यांचे मोठे नुकसान झाले आहे. आता पाऊस उघडला असला तरी फळबागेतील झाडांना खोड कीड, वाळवी लागू नये म्हणून खबरदारी घेणे गरजेचे आहे. काव पेस्ट यासाठी महत्वाची असून, ती कधी लावावी तसेच बाजरात कोणकोणत्या काव पेस्ट उपलब्ध आहेत याबाबत माहिती असणे गरजेचे आहे.

काव पेस्ट म्हणजे काय? : झाडाच्या खोडाला कीड किंवा वाळवी लागू नये तसेच तीव्र उन्हापासून खोडाचे रक्षण व्हावे म्हणून खोडाला एक पेस्ट लावली जाते. तांबड्या किंवा पांढऱ्या रंगाच्या या पेस्टलाच काव पेस्ट असे म्हणतात. अलीकडे बाजारात तयार काव पेस्ट सुद्धा उपलब्ध आहे.




काव पेस्ट कशी बनवतात? : अनेकदा पैशांची बचत करण्यासाठी शेतकरी घरच्या घरी काव पेस्ट बनवतात. काव पेस्ट बनवण्यासाठी खालील साहित्य वापरतात. एका बादलीमध्ये किंवा हौदात हे साहित्य टाकून ते २४ तास भिजत ठेवावे लागते. यानंतर पेस्ट झाडांना ब्रशच्या साहाय्याने लावली जाते.

साहित्य : वीस किलो खडा काऊ. २०० ग्रॅम खडा हिंग. दोनशे ग्रॅम कापूर. दोनशे ग्रॅम डांबर गोळी. हे सगळे २४ तास भिजत घाला व त्यानंतर २०० एम एल हमला औषध याच्यामध्ये मिक्स करून झाडांना ब्रेस्टच्या साह्याने पेस्टिंग करून घ्यावी.

काव पेस्टचे प्रकार : काव पेस्ट घरात बनवता येतेच पण बाजारात तयार काव पेस्टसुद्धा मिळते. काव पेस्टचे तीन प्रकार आहेत. घरी बनवलेली काव पेस्ट, तयार काव पेस्ट, स्प्रे काव पेस्ट. तुमची झाडे मोठी असतील तर स्प्रे काव पेस्ट वापरल्याने वेळेची बचत होते.

काव पेस्ट लावण्याचे फायदे : फळबागेसह सर्वच मोठ्या झाडांना काव पेस्ट लावण्याचे खूप फायदे आहेत. अनेकदा खोडकीड, वाळवी यामुळे झाडांचे फार नुकसान होते. त्यामुळे वेळीच उपाययोजना केल्या तर होणारे नुकसान टाळता येऊ शकते. काव पेस्ट लावल्याने तीव्र उन्हामध्ये झाडाचे उन्हापासून बचाव होतो.

काव पेस्ट केव्हा लावावी? : काव पेस्ट पावसाळा संपला कि लगेच लावावी. तसेच दर वर्षी फेब्रुवारी महिन्यात काव पेस्ट लावावी. एका वर्षात किमान दोन वेळा काव पेस्ट लावणे गरजेचे आहे. जमिनीपासून साधारणपणे ३ फूट उंचीपर्यंत खोडाला ब्रशच्या साहाय्याने पेस्ट लावावी. तसेच जिथे नवीन फांद्या फुटल्यात अशा ठिकाणी काही अंतरापर्यंत पेस्टींग करावे.

## नाचणी लागवड पद्धत

राईप्रमाणे दिसणारी आणि जोंधळयाच्या चवीची असणारी नाचणी हे तृणधान्य शरीरासाठी अत्यंत पौष्टिक समजले जाते. या तृणधान्यात कॅल्शियमबरोबरीने लोह, नायसिन, थायमिन, रिबोफ्लेविन ही महत्त्वाची पोषकद्रव्यं असतात. नाचणीत असणाऱ्या कॅल्शियमच्या विपुल साठयामुळे खेळाडू, कष्टाचे काम करणारे, वाढती मुलं यांना नाचणीपासून बनवलेले पदार्थ खाण्याचा सल्ला डॉक्टर, आहारतज्ज्ञ देतात. हे पीक राज्यातील दुर्गम, आदिवासी भागातील हलक्या व वरकस जमिनीत घेतात. नागली हे दुर्गम भागातील लोकांचे प्रमुख अन्नधान्य आहे. ते सर्व प्रकारच्या जमिनींत येणारे त्याचप्रमाणे जिरायत आणि बागायत पीक आहे. कर्नाटक राज्यात हे महत्त्वाचे पीक असून जवळजवळ भाताइतके क्षेत्र तेथे या पिकाखाली आहे. तमिळनाडू, आंध्र प्रदेश व महाराष्ट्रातही बऱ्याच मोठ्या प्रमाणावर या पिकाची लागवड होते. ते पौष्टिक आणि शक्तिदायक समजले जाते. यात ६ ते ११% प्रथिने, कॅल्शिअम, लोह, स्फुरद पुरेशा प्रमाणात असतात. मधुमेह, अशक्त व आजारी माणसांना नाचणीचा आहार उपयुक्त व गुणकारी मानला जातो. यामुळे रक्तातील कोलेस्टेरॉल कमी होते तसेच मधूमेहाचे प्रमाण कमी होते.

हवामान : नाचणीस उष्ण हवामान मानवते.

जमीन : तांबडवट, फिक्कट व राखी रंगाच्या जमिनीत नाचणी चांगली येते.

पेरणी : बी मुठीने जमिनीत फेकून, पेरून किंवा रोपे लावून लागण करतात. हेक्टरी २५-५० किग्रॅ. बी. लागते. महाराष्ट्रात रोपे तयार करून लावतात.




लागणीत २५ सेंमी. अंतरावरील नांगराच्या सऱ्यांत २० सेंमी. अंतरावर रोपे टाकीत जातात. प्रतिकूल परिस्थितीतही रोप ताबडतोब मूळ धरू शकते.

खते : या पिकाला खत देण्याची प्रथा नाही; पण हेक्टरी ८००-१,००० किग्रॅ. मासळीचे खत किंवा ५० किग्रॅ. नायट्रोजन अमोनियम सल्फेटामधून आणि १० किग्रॅ. फास्फोरिक अम्ल दिल्यास उत्पन्न वाढते. हे पीक पावसाच्या पाण्यावर घेतात.

जाती : गोदावरी, बी ११, पीईएस-११० इंडाफ ८, दापोली १, व्ही एल १४९, जीपीयू २६, २८,पी आर२०२), इ-३१ (निमगरवा) आणि ए-१६ (गरवा). नाचणीच्या तांबूस व पांढऱ्या प्रकारांचे दाणे जास्त पौष्टिक असतात.

उपयोग : नाचणीपासून भाकरी, माल्ट,नुडल्स, पापड, आंबील, इडली बनवितात. रोग व त्यावरील उपाय : करपा, काणी, पानावरील ठिपके व केवडा हे रोग नाचणीवर पडतात.

करपा : हा रोग पायरीक्यूलेरिया एल्युसिनी या कवकामुळे (बुरशीसारख्या हरितद्रव्यरहित वनस्पतीमुळे) होतो. त्यात राखाडी रंगाचे डाग कणसाच्या खालील भागावर आढळतात. त्यामुळे कणसात दाणे चांगले भरत नाहीत. लहान रोपे रोगाला लवकर बळी पडतात. ५:५:५० बोर्डो मिश्रण पिकावर फवारतात.

काणी : हा रोग मेलॅनोप्सिकियम एल्युसिनीस या कवकामुळे होतो. त्यात कणसातील काही दाण्यांचे काणीयुक्त बीजाणुफळांत रूपांतर होते. रोग तुरळक आढळतो. उपाय म्हणून रोगट कणसे काढून नष्ट करतात.

पानावरील ठिपके : हा रोग हेल्मिथोस्पोरियम नोड्यूलोजम या कवकामुळे होतो. यामुळे पानावर तपकिरी ठिपके पडतात. याकरिता बी पेरण्यापूर्वी बियांवर ॲग्रोसानची क्रिया (१:४००) करून घेतात.

केवडा : हा रोग स्क्लेरोस्पोरा मॅक्रोस्पोरा या कवकामुळे उद्भवतो ज्वारी; बाजरी.कीड : नाचणीवरील महत्त्वाची कीड म्हणजे सुरवंट होय. याच्या पतंगांचा नाश करणे हाच उपाय आहे.

## देशी कोंबड्यांचे आहार व्यवस्थापन

कुक्कुटपालनामध्ये एकूण उत्पादन खर्चाच्या अंदाजे ६० ते ७० टक्के खर्च खाद्यावर होत असतो. शरीर व्यवस्थापन, वाढीसाठी तसेच उत्पादनासाठी लागणारी पोषणतत्त्वे ज्या आहारातून पूर्ण होतात अशा आहारास 'संतुलित आहार' म्हणतात. कोंबड्यांना खाद्यात काय देतो यावरून बरेचसे आजार नियंत्रणात येतात. समजा खराब, दूषित खाद्य दिल्याने बरेचसे आजार उद्भवू शकतात.

वयानुसार पोषण तत्त्वांचे प्रमाण : बऱ्याचदा शेतकरी देशी कोंबड्यांना फक्त घरातील उरलेले शिळे अन्न किंवा शेतातील खराब झालेले धान्य देऊन त्यांचे पोषण करतात, परिणामी अशा कोंबड्यांमध्ये आपल्याला वाढ दिसत नाही, अंडी उत्पादन देखील खूप कमी मिळते.

त्या आजारांना सहज बळी पडतात. त्यामुळे कोंबड्यांना त्यांच्या वयाच्या टप्प्यानुसार वेगवेगळे खाद्य द्यावे, कारण त्यांच्या वयानुसार आवश्यक पोषण तत्त्वांचे प्रमाण त्या खाद्यात दिलेले असते. त्यानुसार त्यांच्या वाढीस व उत्पादनानुसार शरीराची गरज भागवता येते. त्यामुळे जेवढा संतुलित आहार देऊ तेवढेच आपल्याला कोंबड्यांपासून उत्पादनाद्वारे निश्चितच परतावा मिळतो.

अंड्यावरील कोंबडीला शरीरात एक अंडे तयार करण्यासाठी २५ ते २६ तास लागतात. त्यासाठी संतुलित आहार खाद्यातून देण्याची गरज आहे. कोंबड्यांची ७० टक्के उत्पादन क्षमता ही त्यांच्या जनुकीय शक्तीवर आणि ३० टक्के उत्पादन क्षमता ही वातावरण, आहारावर अवलंबून असते. त्यामुळे



त्यांना चांगल्या प्रतीचा पोषक आहार देणे महत्त्वाचे आहे. कोंबड्यांची पचन संस्था ही साधी असते, त्यांना दाताऐवजी चोच असते. त्यामुळे त्या खाद्य टिपतात आणि गिळतात. खाद्याचे पोटात पचन होत असते, त्यामुळे त्यांना भरडलेले किंवा चुरा केलेले खाद्य दिल्यास ते पचनास सोपे जाते. फीड रूपांतरण प्रमाण म्हणजेच एफसीआर देखील चांगला मिळतो.

खाद्यातून द्यावयाचे घटक आणि स्रोत : ऊर्जा स्रोत (कार्बोहायड्रेट्स) : खाद्यातील हा अतिशय महत्त्वाचा आणि सर्वात जास्त लागणारा घटक आहे.

कोंबड्यांच्या वाढीचा दर हा खाद्य रूपांतरण क्षमता, अंडी उत्पादन, आरोग्यावर थेट परिणाम करतो. ऊर्जा घटक हा कोंबडीच्या शरीरातील सर्व प्रक्रियांसाठी इंधन म्हणून काम करतो. उदा. मका, ज्वारी, बाजरी, गहू, तांदूळ, जवस तसेच इतर भरड धान्य. मका हा सर्वात जास्त वापरला जाणारा फायदेशीर ऊर्जा स्रोत आहे.

प्रथिन स्रोत (प्रोटिन्स) : कोंबड्यांच्या पचनासाठी परिणामी वजन वाढीसाठी, अंड्यांच्या गुणवत्तेसाठी व सुदृढ आरोग्यासाठी प्रथिन हा महत्त्वाचा घटक आहे. रोगप्रतिकार शक्ती उत्तम ठेवण्यासाठी देखील प्रथिने गरजेची आहेत. उदा. तेल विरहित सोयाबीन पेंड, भुईमूग पेंड, सूर्यफूल पेंड, सरकी पेंड, तीळ पेंड तसेच मांस पावडर, रक्त पावडर, माशांचा चुरा (फिश मिल).

चरबी स्रोत/ स्निग्ध पदार्थ (फॅट्स) : हा खाद्यातील महत्त्वाचा घटक असून याद्वारे शरीराला एकाग्र (स्थिर) असा ऊर्जा स्रोत मिळतो. खाद्य घटकांचे सहज पचन करून पोषक तत्त्वांचे शरीरात शोषण करण्याचे काम चरबीस्त्रोताद्वारे होते. उदा. वनस्पतिजन्य चरबी स्रोत : सोयातेल, पामतेल, शेंगदाणा तेल. प्राणीजन्य चरबी स्रोत : जनावरांची चरबी.

खनिज मिश्रण आणि जीवनसत्वे : यांचा खाद्यात अंतर्भाव अत्यंत कमी प्रमाणात असला तरी त्यांचे महत्त्व कोंबड्यांच्या आहारात आहे. रोगप्रतिकारशक्ती वाढवणे, शरीराची सामान्य वाढ व विकास करणे, हाडांची ताकद वाढवणे, चयापचय प्रक्रिया व अंड्याची गुणवत्ता चांगली ठेवण्याचे काम करतात. उदा. विविध कंपन्यांचे तयार खनिज मिश्रण, जीवनसत्त्वे मिश्रण उपलब्ध आहे, त्याचा थेट खाद्यात प्रमाणात उपयोग करावा.

## दिन विशेष

### जागतिक दिवस:
### लोकशक्ती दिन, जागतिक अस्थिसुषिरता दिन

### महत्वाच्या घटना

१५६८ : साली मुघल शासक अकबर यांनी चित्तोडगढ वर हल्ला केला.
१७७४ : साली कोलकाता(तत्कालीन कलकत्ता) ही भारताची राजधानी बनली होती.
१८२२ : साली ब्रिटीश वर्तमानपत्र 'लंडन संडे टाईम्स' चा पहिला अंक प्रकाशित करण्यात आला होता.
१९०४ : चिली आणि बोलिव्हिया यांनी शांतता करारावर सह्या करून उभय देशांतील सीमा निश्चित केल्या.
१९४७ : अमेरिका आणि पाकिस्तान यांच्यात (पहिल्यांदाच) राजनैतिक संबंध प्रस्थापित झाले.
१९६२ : चीनने भारतावर आक्रमण केले. लडाख आणि ईशान्य भारतात (नेफा) चीनचे सैन्य घुसले आणि त्यांनी भारतीय ठाणी काबीज केली.
१९६९ : डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची अकोला येथे स्थापना
१९७० : हरितक्रांतीचे जनक डॉ. नॉर्मन बोरलॉग यांना नोबेल पारितोषिक जाहीर
१९७१ : मंदीच्या तडाख्यामुळे नेपाळमधील रोखेबाजार कोसळला.
१९७३ : सिडनी ऑपेरा हाऊस चे उद्घाटन एलिझाबेथ (दुसरी) यांनी केले.
१९५० : कृ. भा. बाबर यांनी 'समाजशिक्षणमाला' स्थापन केली. नवशिक्षीत आणि ग्रामीण भागातील जिज्ञासूंना ज्ञानाच्या विविध अंगांची ओळख व्हावी यासाठी श्री. बाबर व त्यांच्या कन्या डॉ. सरोजिनी बाबर यांनी या मालेत शेकडो पुस्तके प्रकाशित केली.
१९५२ : केनियामधे आणीबाणी जाहीर करण्यात आली. जोमो केन्याटा व इतर प्रमुख नेत्यांचे अटकसत्र सुरू.
१९९१ : उत्तरकाशी मधे ६.८ रिश्टर तीव्रतेचा भूकंप होऊन १,००० पेक्षा अधिक जण मृत्यूमुखी पडले.
१९९५ : 'ट्वेंटिएथ सेंचुरी फॉक्स' या संस्थेकडून हिन्दी चित्रपटांतील अभिनेते देव आनंद यांना 'मॅन ऑफ द सेंचुरी' हा सन्मान जाहीर
२००१ : रंगभूमीवर सुमारे ४० वर्षे विविध प्रयोग करणारे पंडित सत्यदेव दुबे यांना 'विष्णुदास भावे गौरवपदक' जाहीर
२०११ : लिबीयन गृहयुद्ध राष्ट्रीय परिवर्तन परिषदेच्या च्या सैनिकांनी हुकूमशहा मुअम्मर गडाफी यांना पकडून ठार केले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५५ : गोवर्धनराम त्रिपाठी गुजराथी लेखक, 'सरस्वतीचंद्र' हा गाजलेला चित्रपट त्यांच्याच चार भागांतील कादंबरीवर आधारलेला आहे. (मृत्यू: ४ जानेवारी १९०७ मुंबई)
१८९१ : सर जेम्स चॅडविक अणूमधील न्यूट्रॉनच्या शोधाबद्दल १९३५ मधे नोबेल पारितोषिक मिळालेले ब्रिटिश पदार्थवैज्ञानिक (मृत्यू: २४ जुलै १९७४)
१८९३ : जोमो केन्याटा केनियाचे पहिले राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: २२ ऑगस्ट १९७८)
१९१६ : मेहबूब हुसेन पटेल ऊर्फ 'शाहीर अमर शेख' लोकशाहीर (मृत्यू: २९ ऑगस्ट १९६९)
१९२० : साली भारतीय कायदेपंडित, मुत्सद्दी आणि पश्चिम बंगालमधील भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे राजकारणी व पश्चिम बंगाल राज्याचे माजी मुख्यमंत्री, पंजाब राज्याचे माजी राज्यपाल व अमेरिकेचे भारतीय राजदूत अशी अष्टपैलू कामगिरी सांभाळणारे सिद्धार्थ शंकर राय यांचा जन्मदिन.
१९२७ : भारतीय कवी आणि समीक्षक गुंटूर सेशंदर शर्मा यांचा जन्म. (मृत्यू: ३० मे २००७)
१९३० : साली भारताची राजधानी दिल्ली येथील उच्च न्यायालयाच्या पहिल्या महिला न्यायाधीश लीला सेठ यांचा जन्मदिन.
१९६३ : नवजोत सिंग सिद्धू क्रिकेटपटू, समालोचक व खासदार
१९७८ : वीरेन्द्र सहवाग धडाकेबाज फलंदाज

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८९० : सर रिचर्ड बर्टन ब्रिटिश लेखक, कवी, संशोधक, मुत्सद्दी आणि गुप्तहेर (जन्म: १९ मार्च १८२१)
१९८२ : भारतीय वरिष्ठ नागरी सेवक अधिकारी तसचं, केरळ आणि मध्य प्रदेश राज्यांचे राज्यपाल निरंजन नाथ वांचू यांचे निधन.
१९६१ : व्ही. एस. गुहा मानववंशशास्त्रज्ञ. १९४६ मध्ये त्यांच्या प्रयत्नांनी कलकत्ता येथे भारतीय मानववंशशास्त्र संशोधन संस्था स्थापन झाली. भारतात जनगणनेच्या कार्यात त्यांनी मौलिक भर घातली. (जन्म: )
१९६४ : हर्बर्ट हूव्हर अमेरिकेचे ३१ वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: १० ऑगस्ट १८७४)
१९७४ : कृष्णाजी गणेश फुलंब्रीकर तथा 'मास्टर कृष्णराव' प्रतिभावान गायक, अभिनेते व संगीतकार, त्यांच्या गायनात ग्वाल्हेर, आग्रा व जयपूर घराण्यांचा संगम दिसून येई. 'वंदे मातरम'ला त्यांनी दिलेली चाल लोकप्रिय ठरली. (जन्म: २० जानेवारी १८९८)
१९८४ : पॉल डायरॅक नोबेल पारितोषिक विजेते इंग्लिश भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: ८ ऑगस्ट १९०२)
१९९६ : दि. वि. तथा 'बंडोपंत' गोखले पत्रकार, युद्धशास्त्राचे अभ्यासक (जन्म:)
१९९९ : माधवराव लिमये समाजवादी नेते, स्वातंत्र्यसैनिक, पत्रकार (जन्म:१९१५)
२००९ : वीरसेन आनंदराव तथा 'बाबा' कदम गुप्तहेरकथालेखक (जन्म: ४ मे १९२९)
२०१० : पार्थसारथी शर्मा क्रिकेटपटू (जन्म: ५ जानेवारी १९४८)
२०११ : मुअम्मर गडाफी लिबीयाचे हुकूमशहा (जन्म: ७ जून १९४२)

# तहसीलच्या छतावर चढून आत्मदहनाचा प्रयत्न

भोकरदन । प्रतिनिधी

तालुक्यातील कोठा दाभाडी येथील जलजीवन मिशन अंतर्गत करण्यात आलेली नोकर भरती रद्द करण्यात यावी या मागणीसाठी कोठा दाभाडी येथील प्रल्हाद शेषराव निलक या तरुणाने भोकरदन तहसील कार्यालयाच्या छतावर चढून अंगावर रॉकेल सारखा ज्वलनशील पदार्थ टाकून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. मात्र सुदैवाने ही बाब लक्षात येताच गटविकास अधिकारी महेंद्र साबळे व नायब तहसीलदार अविनाश पाटील यांनी मध्यस्थी करून त्यांना आत्मदहन करण्यापासून थांबविले.

प्रल्हाद शेषराव निलक व गावकऱ्यांनी यापूर्वी पंचायत समिती भोकरदन येथे व इतर ठिकाणी निवेदन देऊन मागणी केली होती की, ग्रामपंचायत कोठा दाभाडी यांनी जलजीवन मिशन अंतर्गत कर्मचारी भरताना कोणत्याही शासकीय नियमांचे पालन केले नसून पारदर्शकरीत्या भरती न करता संगनमताने कर्मचारयांची भरती केली आहे. सदर नोकर भरती रद्द करून नव्याने जागा भरण्यात याव्यात नसता आम्ही सामूहिकरीत्या आत्मदहन आंदोलन करू. मात्र त्यांच्या मागणीची योग्य दखल न घेतल्या गेल्याने प्रल्हाद निलक यांनी काही सहकाऱ्यांसह शनिवार



१८ ऑक्टोबर रोजी दुपारी भोकरदन तहसील कार्यालय गाठले व मुख्य प्रवेशद्वारा शेजारील लिंबाच्या झाडावरून तहसील कार्यालयाच्या गच्चीवर जाऊन स्वतःच्या अंगावर रॉकेलसारखा ज्वलनशील पदार्थ टाकून घेतला. तहसील कार्यालयाला सुट्टी असल्याने कार्यालयात फारसे कोणी नव्हते मात्र सध्या पोलिस पाटील भरतीची प्रक्रिया उपविभागीय महसूल अधिकारी यांच्यामार्फत सुरू असल्याने तहसीलदार त्या ठिकाणी गेले होते. तर नायब तहसीलदार अविनाश पाटील हे याच निमित्ताने भोकरदन तहसील कार्यालयात उपस्थित होते. सदर बाब त्यांच्या व गटविकास अधिकारी महेंद्र साबळे व तहसील कार्यालय परिसरात साध्या वेशात बंदोबस्ताला असलेल्या पोलिसांच्याही ही बाब लक्षात आल्याने त्यांनी लगेच धावपळ करून प्रल्हाद निलक यांना आत्मदहन करण्यापासून थांबविल्याने मोठा अनर्थ टळला.

### लेखी आश्वासनानंतर आंदोलन मागे

गटविकास अधिकारी साबळे व नायब तहसीलदार पाटील यांच्या उपस्थितीमध्ये ग्रामसेवक ग्रामपंचायत कोठा दाभाडी यांनी आंदोलन करताना लेखी पत्र देऊन कळविले की, जलजीवन मिशन अंतर्गत नल जल मित्र, मोटार मेकॅनिक, फिटर या ट्रेडची परीक्षा घेण्यात आली होती, मात्र ही भरती रद्द करण्यात आली असून अद्यापपर्यंत कुणालाही कामावर रुजू करून देण्यात आले नसून यानंतर जेव्हा केव्हा भरती करायची असेल ती जाहीर प्रगटन काढून व शासकीय नियमाप्रमाणेच करण्यात येईल, असे लेखी पत्र ग्रामपंचायत अधिकारी एस.डी. भारती व एस. पी. दौड, तालुका कॉरनेटर, नवोदय कृषी संशोधन तालुका भोकरदन यांनी लेखी स्वरूपात दिल्यानंतर हे आत्मदहन आंदोलन मागे घेण्यात आले.

# कर्जमाफीचे ५ हजार ८०० कोटी सहा आठवड्यांत द्या - खंडपीठाचे आदेश

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

राज्य सरकारने २०१७ मध्ये जाहीर केलेल्या शेतकरी कर्जमाफी योजनेतील वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांचे पैसे सहा आठवड्यांत देण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्या. नितीन सूर्यवंशी आणि न्या. वैशाली जाधव-पाटील यांनी दिले आहेत. या कर्जमाफीतील ६ लाख ५८ हजार शेतकऱ्यांचे सुमारे ५ हजार ८०० कोटी रुपये थकीत आहे.

राज्य सरकारने २०१७ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना जाहीर केली होती. त्यानुसार शेतकऱ्यांचे दीड लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. पुरेसा निधी नसल्यामुळे हजारो शेतकरी अद्याप योजनेपासून वंचित आहेत. पात्र असूनही कर्जमाफी योजनेचा लाभ मिळाला नसल्याची याचिका शेतकरी भाऊसाहेब बजरंग पारखे यांनी खंडपीठात दाखल केली होती. त्यावर खंडपीठाने वंचित शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचे आदेश दिले होते.



या निर्णयाची अंमलबजावणी झाली नसल्यामुळे ॲड. अजित काळे यांनी अवमान याचिका दाखल केली होती. या याचिकेवर शुक्रवारी सुनावणी झाली. कर्जमाफी योजनेत राहिलेल्या शेतकऱ्यांसाठी सहा आठवड्यांत निधी उपलब्ध करावा, असे आदेश खंडपीठाने दिले आहेत. योजनेंतर्गत सहा लाख पात्र शेतकऱ्यांसाठी निधी उपलब्ध करण्यात आला नव्हता. पात्र शेतकऱ्यांसाठी निधी देण्याची मागणी सहकार विभागाने एक ऑक्टोबर २०२५ रोजी केली होती. नियोजन व वित्त विभागाने सहा आठवड्यांत निधी उपलब्ध करून देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

# आ.बांगर यांची गरजू मुलांसोबत दिवाळी

हिंगोली । प्रतिनिधी

हिंगोलीत शिंदे सेनेचे आमदार संतोष बांगर यांनी गरजू मुलांसोबत दिवाळी साजरी केली. यावेळी त्यांनी मुलांशी तसेच त्यांच्या कुटुंबियांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन दिले. यावेळी हजारो मुलांना कपड्यांचे वाटप केले. नवीन ड्रेस पाहताच मुलांच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव दिसून आले.

दिवाळीचा मोठा सण प्रत्येक कुटुंब उत्साहाने साजरा करतो. आकाशदिवे, गोड पदार्थ, नवीन कपड्यांची खरेदी केली जाते. मात्र हातावर पोट असलेल्या गरजू कुटुंबांसाठी दररोजच सण, उत्सव असतात. दिवसभर काम केल्यानंतर मिळालेल्या पैशातून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. पोटात अन्न पडले हाच त्यांचासाठी आनंदाचा सण असतो. दरम्यान, आमदार संतोष बांगर यांनी गरजू कुटुंबासोबत दिवाळी साजरी करण्याचा निर्णय घेतला. या कुटुंबाच्या तसेच त्यांच्या मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद द्विगुणीत करण्यासाठी शनिवारी सकाळीच परिसरातील



गरजू कुटुंब व मुलांना सोबत घेत दिवाळी पहाट साजरी केली. यावेळी त्यांनी उपस्थित मुलांना मार्गदर्शन केले.

कुठलीही परिस्थिती असली तरी शिक्षण सोडू नका, शिक्षणामुळेच माणूस मोठा होतो हे लक्षात ठेवा. शिक्षणात काही अडचण असेल तर आपण त्या दूर करणार आहे. तुमच्या अडचणी सोडवण्यासाठी आपण सदैव तयार असल्याचे आश्वासन त्यांनी मुलांसह त्यांच्या कुटुंबियांना दिले. यावेळी हजारो मुलांना नवीन ड्रेसचे वाटप केले. यावेळी नवीन ड्रेस मिळताच मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहात होता. या उपक्रमातून आमदार बांगर यांनी सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला.

यावेळी माजी नगरसेवक श्रीराम बांगर, सुभाष बांगर, गणेश बांगर, संतोष वेरुळकर, मंगेश दराडे, संदीप बांगर, राहुल घुगे, राहुल बांगर, चेतन नागरे आदी युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तीन वर्षांच्या चिमुकलीवर अनैसर्गिक अत्याचार करणाऱ्याला फाशी द्या

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

तीन वर्षांच्या चिमुरडीवर शाळेच्या आवारात अनैसर्गिक अत्याचार करणारा आरोपी विजय हरिदास जीवनवाल याच्याविरुद्ध जलदगती न्यायालयात खटला चालवून फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी करत नागरिकांनी पोलिस आयुक्तालयासमोर आंदोलन केले. तसेच संबंधित शाळेतील शिक्षक, शिक्षिका व संचालक हेही जबाबदार असून त्याच्यावरही कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

आंदोलनावेळी लक्ष्मण सोनवणे, माजी नगरसेवक मनोज गांगवे, संजय बन्सवाल, सुनितर बरथुने, मधुकर जातोडे, हरेश गांगवे, संतोष जाटवे आदी उपस्थित होते. अधिक माहितीनुसार, १४ ऑक्टोबर रोजी बालिकेने घरी आईसमोर आपल्यासोबत झालेल्या प्रकाराची माहिती दिल्यानंतर हा सर्व प्रकार उघडकीस आला. तक्रारदार महिलेची तीन वर्षांची मुलगी आणि पाच वर्षांचा मुलगा



दोघेही एकाच शाळेत शिकतात. शाळा सुटल्यानंतर पालक पोहोचण्याआधीच विजय जीवनवाल ही मुलगी खेळण्याच्या कारणावरून घरी घेऊन जात असे, आणि त्याच दरम्यान त्याने घृणास्पद कृत्य केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी वेदांतनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी आरोपीला अटक केली. मात्र, शाळा परिसरात विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष कसे झाले, बाहेरील व्यक्तींना मुलांशी असा संपर्क कसा मिळाला, असा सवाल संतप्त आंदोलनादरम्यान उपस्थित केला. समाजबांधवांनी या घटनेचा निषेध नोंदवण्यासाठी नागरिकांनी पोलिस आयुक्तालयासमोर जोरदार निदर्शने केली. आरोपीला कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी केली.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या विद्यार्थ्यांना दिवाळी भेट



परभणी । प्रतिनिधी

मराठवाड्यात अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात शेतीसह शेतकऱ्यांचे नुकसान झाले. याचा फटका विद्यार्थ्यांच्या शिक्षणालाही बसला. अशा संकटग्रस्त विद्यार्थ्यांना आधार देण्यासाठी नाशिकच्या पंचवटी येथील लोकनेते व्यंकटराव हिरे (स्वायत्त) महाविद्यालयाने पुढाकार घेत येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील अतिवृष्टीग्रस्त १५० विद्यार्थ्यांना दिवाळी भेट दिली.

राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या आवाहनानुसार हा उपक्रम राबविण्यात आला. डॉ. योगिता हिरे यांच्या मार्गदर्शनात महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी मदत निधी गोळा केला. यातून विद्यार्थ्यांना प्रत्येकी १ हजार रोख, शालेय बॅग, सहा नोटबुक, किराणा सामान आणि दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात हा वितरण सोहळा पार पडला. यावेळी प्राचार्य डॉ.बी.एस. जगदाळे, डॉ. बाळासाहेब जाधव, डॉ. प्रकाश शेवाळे, डॉ. श्रीनिवास केशेट्टी, डॉ. जयंत बोबडे, डॉ. तुकाराम फिसफिसे, संदीप मारके, डॉ. भूषण चकोर आदी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. जगदाळे म्हणाले, विद्यार्थ्यांचे मानसिक बळ वाढविण्यासाठी हिरे महाविद्यालयाच्या माध्यमातून दिवाळीच्या काळात मदतीचा हात देण्यात आला. तर डॉ. बाळासाहेब जाधव म्हणाले, ही मदत विद्यार्थ्यांसाठी उभारी देणारी असून आमच्या महाविद्यालयाला मिळालेला हा पाठिंबा महत्वाचा आहे. सूत्रसंचलन डॉ. तुकाराम फिसफिसे तर आभार डॉ. जयंत बोबडे यांनी मानले. यशस्वीतेसाठी रवी कावळे, सुरेश पेदापल्ली, अशोक कलंबरकर, सय्यद सादिक, साहेब येलेवाड, दिलीप निर्वळ, गणेश गरड, अमित बीडला, सागर खुणे, बापूराव कदम आदींनी परिश्रम घेतले.

# ३१ मार्चपूर्वी सगळा ऊस गाळप करू - आ.डॉ. उढाण

घनसावंगी । प्रतिनिधी

मतदारसंघातील एकही ऊस शिल्लक ठेवायचा नाही, ३१ मार्च २०२६ पर्यंत सगळा ऊस गाळप झाला पाहिजे, असा ठाम निर्धार आमदार डॉ. हिकमत उढाण यांनी व्यक्त केला आहे.

शिवसेना जनसंपर्क कार्यालय घनसावंगी येथे आमदार हिकमत उढाण यांच्या अध्यक्षतेखाली भव्य ऊस नियोजन मेळावा पार पडला. मतदारसंघातील तब्बल नऊ साखर कारखान्यांचे कृषी अधिकारी, शिव सेना पदाधिकारी आणि ऊस उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व कारखान्यांनी सुरुवातीपासूनच टोळ्या आणि हार्वेस्टर उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. यावेळी आमदार हिकमत उढाण म्हणाले की, ऊस वेळेत कारखान्यात गेल्यास शेतकऱ्यांचा पाणी, मजुरी आणि वीज खर्च मोठ्या प्रमाणात वाचतो, खोडव्याचे नियोजन चांगल्या पद्धतीने करता येते आणि उत्पादनही वाढते. तसेच शेत लवकर मोकळे झाल्याने पुढील वर्षाचे पीक नियोजन नीट करता येते. ''ऊस उशिरा गेला की वजन घटते आणि शेवटी नुकसान शेतकऱ्यांचंच होतं. त्यामुळे वेळेत गाळप करणे हे सगळ्यांचं कर्तव्य आहे,'' ऊस उत्पादक शेतकरी, शिव सेना समन्वयक आणि कारखान्यांचा घनिष्ठ समन्वय साधत ३१ मार्च २०२६ पूर्वी ऊस गाळप पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले.

# दिव्यांगांना धनादेश व किराणा किटचे वाटप

वडवणी।प्रतिनिधी

वडवणी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे यांच्या मार्गदर्शनाखाली वडवणी तालुक्यातील विविध ग्रामपंचायतच्या वतीने दिव्यांग बांधवांसाठी आगळीवेगळी दिवाळी साजरी करण्यात आली दिव्यांगांना किराणा किटचे तर काही ग्रामपंचायतीच्या दिव्यांगांना धनादेशाचे वाटप करून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण केला.

मोरेवाडी व देवदहिफळ बु. या ग्रामपंचायतीने पाच टक्के ग्रामनिधीतून दिव्यांग बांधवांना किराणा किटचे वाटप करून त्यांची दिवाळी गोड केली आहे कान्हापूर व मोरेवाडी येथील ग्रामपंचायत च्या वतीने दिवंगांना प्रत्येकी १००० रुपयांचा धनादेश वडवणी न्यायालयाचे न्यायाधीश गीते साहेब यांच्या हस्ते वाटप करण्यात आले तसेच तिगाव, कोठरबण, परडी माटेगाव, कुप्पा, पुसरा, केंडे पिंपरी या ग्रामपंचायतच्या वतीने दिव्यांगाना किराणा किटचे व धनादेशाचे वाटप करण्यात आले याउपक्रमात



ग्रामपंचायत सदस्य, सरपंच,ग्रामसेवक व स्थानिक कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग घेतला सामाजिक बांधिलकी जपत ग्रामपंचायतींनी दिव्यांगाच्या आयुष्यात आनंदाची गोडी आणण्याचा प्रयत्न केला. गट विकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे यांनी सांगितले की,ग्रामपंचायतीने अशा समाजभिमुखम उपक्रमाद्वारे दिव्यांगाना आत्मसनमानाने जगण्याची प्रेरणा दिली आहे हा उपक्रम सर्व ग्रामपंचायत साठी आदर्श ठरला आहे. ग्रामपंचायती केवळ प्रशासनाच्या केंद्र नसून त्या समाज जीवनाचा हृदय स्पंदन आहेत दिव्यांगाच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणे म्हणजे खरी विकासाची दिशा या अनोख्या उपक्रमामुळे वडवणी तालुक्यातील दिव्यांग बांधवांची दिवाळी यंदा खऱ्या अर्थाने उजळून निघाली.

# केंद्रीय कृषीमंत्री शेतकऱ्यांना संबोधित करणार!

## ०७ नोव्हेंबर रोजी भव्य शेतकरी संवाद मेळाव्याचे आयोजन

परळी वैजनाथ

०७ नोव्हेंबर २०२५ रोजी सिरसाळा येथे भव्य शेतकरी संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमास केंद्रीय कृषी तथा ग्रामीण विकास मंत्री शिवराजसिंह चौहान यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. ग्लोबल विकास ट्रस्टचे अध्यक्ष मयंक गांधी यांच्या संकल्पनेतून सदरील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, माराठवाड्यातील शेतकरी बांधवांना केंद्रीय कृषीमंत्री संबोधित करणार आहेत. या कार्यक्रमास अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार असल्याचेही संयोजकांच्या वतीने कळवण्यात आले आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की,



ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी यांच्या संकल्पनेतून सिरसाळा येथे भव्य शेतकरी संवाद मेळावा आयोजित करण्यात आला आहे. सदरील कार्यक्रमास केंद्रीय कृषी तथा ग्रामीण विकास मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्यासह महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, राज्याच्या पशुसंवर्धन तथा दुग्धविकास मंत्री पंकजाताई मुंडे, आमदार धनंजय मुंडे, बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. ''कृषीकुल'' हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शेतकरी प्रशिक्षण केंद्र आहे. ग्लोबल विकास ट्रस्टचे अध्यक्ष मयंक गांधी यांच्या संकल्पनेतून या वास्तूची उभारणी करण्यात आलेली असून, येथे मराठवाड्यातील हजारो शेतकऱ्यांना आधुनिक शाश्वत शेतीचे परिपूर्ण प्रशिक्षण मोफत दिले जाते. जागतिक दर्जाच्या या प्रशिक्षण केंद्राला केंद्रीय कृषी तथा ग्रामीण विकास मंत्री शिवराजसिंह चौहान भेट देणार आहेत. यानिमित्ताने शेतकरी संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले असून, हजारो शेतकरी कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात केंद्रीय कृषीमंत्री उपस्थित शेतकऱ्यांना संबोधित करणार आहेत. ग्लोबल विकास ट्रस्टचे अध्यक्ष मयंक गांधी यांच्याकडून शेतकऱ्यांच्या समस्या, शेती - मातीच्या गरजा, पुरपरिस्थितीमुळे निर्माण झालेल्या समस्या आणि त्यावरील उपाययोजना तसेच शेती विकासाच्या नव्या दिशा उपस्थित मान्यवरांसमोर ठेवण्यात येणार आहेत.

# चौथीच्या दोन विद्यार्थिनींवर अत्याचार; मुख्याध्यापक अटकेत

अहिल्यानगर । प्रतिनिधी

जिल्ह्यातील अकोले येथील प्राथमिक शाळेत चौथीत शिकणाऱ्या दोन विद्यार्थिनींचा विनयभंग करणाऱ्या मुख्याध्यापकाला अकोले पोलिसांनी अटक केली. याप्रकरणी पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांकडून समजलेली माहिती अशी, की चौथीमध्ये दोन चुलत बहिणी शिकत आहेत. या मुली रडत-रडत घरी आल्यावर वडिलांनी विचारपूस केल्यावर एकीने घडलेली हकीकत सांगितली. मुख्याध्यापक गोरख कुशाबा लोहरे याने कॉम्प्युटर रूम साफ करायची म्हणून मुलींना कॉम्प्युटर रूममध्ये नेत विनयभंग केला. नोव्हेंबर २०२४ पासून वेळोवेळी असा असा प्रकार घडत होता. घरी सांगितले तर तुम्हाला मारेन, अशी धमकी मुख्याध्यापकाने दिली होती. पीडितांच्या



पालकांनी तात्काळ पोलिसांत तक्रार दाखल केल्यानंतर, पोलिसांनी त्वरित गुन्हा दाखल करत लोहरे याला अटक केली. पुढील तपास पोलिस उपनिरिक्षक हजारे करत आहेत.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
सोमवार, दि.२० ऑक्टोबर २०२५ | ६

# परळी तालुक्यातील शेतकऱ्यांची दिवाळी गोड केल्याबद्दल ना.पंकजाताई मुंडे यांनी मानले मुख्यमंत्र्यांचे आभार

## पीक नुकसानीचे ४८ कोटी ३३ लाख रुपये शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

**ऑगस्ट आणि सप्टेंबर २०२५ या महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पीकाचे मोठे नुकसान झाले होते. या नुकसानीची भरपाई देवून शेतकऱ्यांची दिवाळी गोड केल्याबद्दल राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत. तालुक्यातील पीक नुकसानीचे सुमारे ४८ कोटी ३३ लाख रुपये सरकारने शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग केले आहेत.**

यावर्षीच्या ऑगस्ट व सप्टेंबर या दोन महिन्यात सगळीकडेच अतिवृष्टी झाल्याने शेतकऱ्यांच्या शेतातील पीकांचे मोठे नुकसान झाले. तालुक्यातील शेतकऱ्यांना याचा मोठा फटका बसला.



मुसळधार पावसामुळे शेतातील उभ्या पिकांत पावसाचे पाणी साचले तर अनेक ठिकाणी जमिनी खरडून गेल्याने शेतकऱ्यांचे कधीही भरुन न निघणारे नुकसान झाले.

या सर्व नुकसानीची दखल घेवून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ३१ हजार कोटीचे पॅकेज जाहीर करुन शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला होता. ना.पंकजाताई मुंडे यांनी बीड व जालना जिल्ह्याचा दौरा करुन अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी यासाठी शासन दरबारी प्रयत्न केले होते.

ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात परळी तालुक्यात झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे पिकांच्या नुकसान भरपाई पोटी ५४ हजार शेतकऱ्यांना ४८ कोटी ३३ लाख रुपयाचे अनुदान त्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात आले आहेत. शेतकरी संकटात असताना ऐन दिवाळीत सरकारने अनुदानाचे वाटप करुन त्यांची दिवाळी गोड केल्याबद्दल ना.पंकजाताई मुंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांचे आभार मानले आहेत.

# शॉर्टसर्किटने ऊस जळाला

## शेतकऱ्याचे लाखोंचे नुकसान

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

विजेच्या तारा एकमेकाला चिटकल्याने शॉर्टसर्किट होऊन दिंद्रुड येथील शेतकऱ्याचा तीन एकर ऊस जळून खाक झाल्याची घटना रविवारी दुपारी घडली.

वैजनाथ व्यंकटराव काशीद या शेतकऱ्याचे दिंद्रुड येथील गट नंबर २०३ मध्ये ३ एकर ४ गुंठे भरीव ऊस लागवड केलेली आहे. रविवारी दुपारी साडेबाराच्या सुमारास ११ केव्हीच्या लाईन वरील दोन तारा एकमेकास चिटकून शॉर्टसर्किट झाले, यामुळे जवळपास तोडणीस आलेला संपूर्ण उसाचा शेताने पेट घेतला, स्थानिकांनी आग विझवण्याचा



प्रयत्न अखेर निषफळ ठरल्याने सर्व ऊस जळून खाक झाला आहे. महसूल प्रशासनाने तात्काळ पंचनामा करून शेतकऱ्याला मदत करण्याचे आवाहन शेतकरी वर्गातून होत आहे.

# वडवणी पोलिसांनी छापा टाकून ७४,२०० रुपयाचा पकडला गुटखा

वडवणी। प्रतिनिधी

बीड पोलीस अधीक्षक नवनीत कावत व अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली वडवणी पोलीस स्टेशनच्या स.पो.नि.वर्षा व्हगाडे व पोलीस हवालदार विलास खरात,पोलीस हवलदार भास्कर राऊत,पोलीस हवालदार दादासाहेब उबाळे, पोलीस अमलदार वसंत करे यांच्या टीमने मिळालेल्या माहितीवरून छापा टाकून शेख फैसल शेख खलील वय २८ वर्षे राहणार तेलगाव नाका,बीड यांच्या ताब्यात असलेल्या क्रमांक - १२ ५४४ यामध्ये गोवा,विमल,रॉयल अशा विविध तंबाखू मिश्रित




स.पो.नि.वर्षा व्हगाडे यांची कारवाई

गुटख्याचा माल बाळगताना आढळून आले सदर प्रकरणात आरोपीला अटक केलेली असून त्यांच्याकडून ७४२०० रुपयाचा गुटखा व ऑटोसह २,२४२०० रुपयाच्या किमतीचा एकूण मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या पोलिसाच्या कारवाईमुळे वडवणी तालुक्यात अवैद्य धंदे चालवणाऱ्याला चाप बसला आहे.

# नाम फाउंडेशनतर्फे बीड जिल्ह्यात एक हजार शेतकऱ्यांना मोफत बियाणे देणार

बीड । प्रतिनिधी

पूरग्रस्त आणि अतिवृष्टीने बाधित झालेल्या शेतकऱ्यांना नाम फाउंडेशन यांच्यातर्फे बीड जिल्ह्यात एक हजार शेतकऱ्यांना बियाण्याचे वाटप करण्यात येत आहे. आज कुर्ला येथील २०० शेतकऱ्यांना या बियाण्याचे वाटप स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ॲड .अजित एम. देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

सिने अभिनेते नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांच्या नाम फाउंडेशनने सामाजिक उद्दिष्ट समोर ठेवून पूरग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा हात दिला आहे. एक हजार शेतकऱ्यांना प्रत्येकी तीस किलो



हरभऱ्याचे बी आणि आठ किलो ज्वारीचे बी देण्यात येणार आहे.

कुर्ला येथे अतिवृष्टीसह मोठ्या पुराच्या पाण्यात लोक देखील अडकले होते. शेतीचे या ठिकाणी मोठे नुकसान झालेले आहे. पुरात अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापनाची स्वतंत्र टीम बाहेरून मागवण्यात आली होती. त्यामुळे या शेतकऱ्यांना मदतीची आवश्यकता होती. स्वराज्य जनजागृती परिषदेचे सचिव तुषार पाटील यांच्यासह रत्नाकर मार्कड घोडके सर, गोवर्धन मस्के आणि इतरांनी पान २ वर

# तळणीत सोयाबीन खरेदीला सुरूवात!



## ४ हजार १०० रुपये ने खरेदी सुरू

मंठा । प्रतिनिधी

तालुक्यातील तळणी येथे रविवारी ( दि. १९ ऑक्टोबर २०२५ ) रोजी सोयाबीन खरेदीचा शुभारंभ राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष मा. ज्ञानेश्वर (माऊली) सरकटे यांच्या हस्ते करण्यात आला. या खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांना पान २ वर

# बीड नगरपरिषद निवडणुकीत प्रभाग क्र. ९ मधून सज्ज - राजू महुवाले

## पक्षाने आदेश दिल्यास चंदाताई राजू महुवाले नगराध्यक्षपदासाठी उतरणार!

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील आगामी नगरपरिषद निवडणुकीचा राजकीय ताप वाढत असताना, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडून शहरात नवचैतन्य निर्माण करणारे कार्यकर्ते म्हणून ओळखले जाणारे राजू भारत महुवाले यांनी प्रभाग क्रमांक ९ मधून निवडणूक लढविण्याची तयारी दर्शवली आहे.

विशेष म्हणजे, बीड नगरपरिषदेच्या अध्यक्षपदासाठी अनुसूचित जाती महिला राखीव जागा जाहीर झाल्याने, सौ. चंदाताई राजू महुवाले या शिवसेनेकडून अध्यक्षपदाच्या उमेदवार म्हणून पक्षश्रेष्ठींचा आदेश मिळाल्यास निवडणूक रिंगणात उतरणार, असं राजू महुवाले



म्हणले.

राजू महुवाले हे अनेक वर्षांपासून शिवसेनेशी निष्ठेने असून, त्यांनी पक्षाच्या संघटनात्मक पातळीवर शाखा प्रमुख, विभाग प्रमुख, तालुका संघटक म्हणून या जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. सध्या ते बीड शहराचे उपजिल्हाप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली गेल्या अनेक वर्षांत पक्ष संघटना मजबूत झाली असून, शहरातील विविध भागांमध्ये त्यांनी जनतेचा विश्वास संपादन केला आहे.२००६ च्या नगरपरिषद निवडणुकीतही राजू महुवाले यांनी शिवसेनेच्या धनुष्यबाण चिन्हावरून निवडणूक लढवली होती. मात्र त्यांची अल्पश्या मतांनी पराभव झाल्यानंतरही त्यांनी निराश न होता, सातत्याने पक्षासाठी कार्य करत जनतेच्या मनात आपली ओळख निर्माण केली. बीड शहरात प्रत्येक वॉर्ड, प्रत्येक गल्ली-बोळात त्यांचा जनसंपर्क आहे. त्यांनी पान २ वर

# गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे यांच्या मार्गदर्शनाखाली दिव्यांगांची दिवाळी गोड

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे यांच्या मार्गदर्शनाखाली वडवणी तालुक्यातील विविध ग्रामपंचायतच्या वतीने दिव्यांग बांधवांसाठी आगळीवेगळी दिवाळी साजरी करण्यात आली दिव्यांगांना किराणा किटचे तर काही ग्रामपंचायतीच्या दिव्यांगांना धनादेशाचे वाटप करून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण केला.

मोरेवाडी व देवदहिफळ बु. या ग्रामपंचायतीने पाच टक्के



दिव्यांगांना धनादेश व किराणा किटचे वाटप

ग्रामनिधीतून दिव्यांग बांधवांना किराणा किटचे वाटप करून त्यांची दिवाळी गोड केली आहे कान्हापूर व मोरेवाडी येथील ग्रामपंचायतच्या वतीने दिवंगांना प्रत्येकी १००० रुपयांचा धनादेश वडवणी न्यायालयाचे न्यायाधीश गीते साहेब यांच्या हस्ते वाटप करण्यात आले तसेच तिगाव,कोठरबण,परडी माटेगाव,कुप्पा,पुसरा,केंडे पिंपरी या ग्रामपंचायतच्या वतीने दिव्यांगाना किराणा किटचे व धनादेशाचे वाटप करण्यात आले याउपक्रमात ग्रामपंचायत पान २ वर

# रत्नाकर घोळवे नशामुक्त अभियानचे नोडल ऑफिसर

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा नशा मुक्त करण्याच्या उद्देशाने पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी या विशेष उपक्रमाची सुरुवात केली असून या मोहिमेसाठी जिल्हास्तरावर दहशतवाद विरोधी पथकाचे प्रभारी अधिकारी रत्नाकर घोळवे यांची नोडल ऑफिसर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

या उपक्रमांतर्गत अमली पदार्थ जसे की गांजा लागवड, विक्री, वाहतूक, साठा किंवा वापर तसेच नशेची औषधे व गोळ्या ,सोल्युशन, व्हाइटनर यांचा साठा ,वाहतूक, विक्री किंवा वापरासंबंधी कुठलीही माहिती नागरिकांना मिळाली तर पोलीस विभागाला कळवावे यासाठी ९२७० २४ ३२ ०० हा मोबाईल क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला आहे. याशिवायही नागरिक वर सुद्धा आपली तक्रार नोंदवू शकतात. माहिती देणाऱ्या व्यक्तीचे नाव व त्याचा मोबाईल क्रमांक पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येणार असून कोणत्याही परिस्थितीचा उलगडा होणार नाही याची हमी पोलीस विभागाकडून देण्यात येत आहे. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी जिल्ह्यातील नागरिकांना व्यसनमुक्ती जागृतीबाबत पुढाकार घेण्याचे आवाहन केले असून अमली पदार्थ विषयी कोणती संशयास्पद हालचाल दिसल्यास त्वरित कळवावे. आपल्या छोट्याशा माहितीने एखाद्या तरुणाचे भविष्य वाचू शकते. आणि आपल्या जिल्ह्याला नशा मुक्त करण्याचा मोठा हातभार लागू शकतो. असेही पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी म्हटले आहे.

# घरफोडीचे सहा गुन्हे उघडकिस, स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये रात्रीच्या घरफोड्या, बस स्थानकावरील चोऱ्या ,साखळी चोर, सभेमधील चोऱ्या असे सहा गुन्हे उघडकीस आले असून स्थानिक गुन्हे शाखेने प्रयत्नांची पराकाष्ठा करून हे गुन्हे उघडकीस आणले आहेत गुन्हयातील मुद्देमाल आणि आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे .

माजलगाव शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन ठिकाणी पिताजी नगरी येथील बंद घर आणि पत्र्याचे शेड या दोन ठिकाणी घरफोड्या झाल्या होत्या.अमीर उर्फ लंगडा लाला जहांगीर खान पठाण राहणार ढगे कॉलनी बीड व आयान असलम शेख राहणार अजित पुरा बीड या दोघांनी मिळून



या घरफोड्या केल्याचे स्पष्ट झाले. माने कॉम्प्लेक्स परिसरात आयन शेख उभा असल्याची माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेने त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून चोरी गेलेल्या सोने ,चांदी व नगदी असा सात हजार रुपयांचा माल जप्त केला. आयान शेख याला पुढील तपासासाठी माजलगाव पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. तर दुसरा आरोपी अमीर उर्फ लंगडा लाला हा बीड कारागृहात आहे. याशिवाय गेवराई येथे बस स्थानकावर एक महिला बसमध्ये चढत असताना तिच्या गळ्यातील सोन्याचे लॉकेट चोरी गेले होते. या गुन्ह्यातील आरोपी मनोज उर्फ शरद्या महादेव बहिरवाळ माऊली नगर नाळवंडी नाका बीड याने ही चोरी केली होती. त्याला बीड बस स्थानकाजवळ फिरत असताना ताब्यात घेऊन त्याच्याकडून सोन्याची चैन हस्तगत केली. आरोपी आणि मुद्देमाल पुढील तपासासाठी गेवराई पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला आहे. याशिवाय छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणावर सभेमध्ये गर्दीचा फायदा घेऊन मोबाईल व नगदी चोरी करणारा आरोपी जिल्हा परिषद कार्यालय समोर थांबला असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नितीन अशोक जाधव रा. गांधीनगर नाळवंडी नाका बीड याला ताब्यात घेऊन मोबाईल व नगदी रक्कम हस्तगत केली. त्याची चौकशी केली असता त्यांने आणखी दोन ठिकाणी चोऱ्या केल्याचे उघड झाले. या प्रकरणी आरोपीला बीड शहर पोलिसांच्या पान २ वर

# आयुर्वेदामध्ये सोरायसिसवर रामबाण इलाज

## श्याम पाटील यांनी तयार केले झाडपाला आणि मुळापासून औषध

बीड । प्रतिनिधी

सोरायशीस हा अनेक व्यक्तींना त्रासदायक ठरणारा चमडी चा रोग आहे. याने अनेक जण त्रस्त आहेत. अंगावर, पायावर खाज येणे, लाल चट्टे येणे, त्याची आग होणे या गोष्टी सोरायसिस मुळे होतात. अनेक जण रात्र रात्र झोपत नाहीत. यावर आता आयुर्वेदामध्ये रामबाण उपाय मिळाला असून बीड शहरातील आयुर्वेद वैद्य श्याम पाटील यांनी याच्यावर झाडपाला आणि मुळांपासून एक औषध तयार केले आहे. हे औषध प्रभावीपणे यावर काम करत असून अनेक रुग्णांना याचा फायदा झाला आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून अनेक रुग्ण या ठिकाणी आले आणि बरे होऊन गेले असे श्याम पाटील सांगतात.



सोरायसिस मुळे अनेक जण त्रस्त होतात. हाता पायावर खाज येणे, पाठीवर चट्टे येणे, त्याची खाज सुटणे आणि खाजवल्यावर आग होणे असे प्रकार या रोगामुळे घडतात. या रोगावर ॲलोपॅथी मध्ये कायमस्वरूपी इलाज नसल्याचे सांगितले जाते. ट्रीटमेंट दिली की हा रोग तात्पुरता बरा होतो. मात्र पुन्हा सुरु होतो. यासाठी आयुर्वेदामध्ये बीड मधील रहिवासी श्याम पाटील यांनी भक्कम उपाय शोधला असून अनेक झाडांची पाने आणि अनेक झाडांची मुळे एकत्र करून त्यांनी एक पातळ औषध बनवले आहे. हे औषध गरम पाण्यामध्ये घेऊन ज्या ठिकाणी खाज आहे त्या ठिकाणी मसाज करावी सात -आठ दिवसांमध्ये रुग्णांना याची प्रचिती येते. या औषधाचा वापर केल्यापासून दोनच दिवसात अशा रुग्णांना पान २ वर



# अभिनेते डॉ. महेश कुमार भारत राष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित

**बीड । प्रतिनिधी**

हिंदी, मराठी, भोजपुरी चित्रपटांचे मुख्य अभिनेते आणि बीडचे भूमिपुत्र डॉ. महेश कुमार यांना रायझिंग स्टार ऑफ इंडियन सिनेमा यांच्यावतीने ''भारत राष्ट्र भूषण पुरस्कार'' मुंबई येथे शानदार कार्यक्रम नुकताच मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. विविध भाषेतील समाज प्रबोधक चित्रपटांसाठी त्यांचे कौतुक करण्यात आले. सत्कार समारंभामध्ये बोलताना डॉ. महेश



कुमार म्हटले की चित्रपट हा समाजाचा आरसा असतो, मनोरंजनासोबतच जर एखादा विचार देता आला तर नव्या पिढीत नवा दृष्टिकोन वृद्धिंगत होईल असा माझा पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# राष्ट्रवादीत येणाऱ्यांना सन्मानाची वागणूक देऊ

## अजित पवार ; दौंडमध्ये भाजपचे पदाधिकारी राष्ट्रवादीत दाखल

दौंड । प्रतिनिधी

सरकार येत असते जात असते, सगळेच जण त्याच ठिकाणी राहतात असे नाही. जसे चार दिवस सासूचे असतात तसेच चार दिवस सुनेचे सुद्धा येतात. त्यामुळे आपण कधीही सत्ता असली म्हणून मस्ती दाखवू नये. सत्ता नसली तरी ना उमेद होऊ नये. नव्याने पक्षात आलेल्या सर्वांना राष्ट्रवादी काँग्रेस मान सन्मानाची वागणूक देणार आहे. आगीतून उठलो आणि फुफाट्यात पडलो, अशी वेळ माझ्यासहित कोणीही तुमच्यावर येऊ देणार नाही, हा शब्द मी देतो, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. दौंड शहर व तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आयोजित केलेल्या जाहीर प्रवेश सोहळा व संवाद मेळावा कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर, माजी आमदार रमेश थोरात, माजी जिल्हा परिषद सदस्य वीरधवल जगदाळे, गुरुमुख नारंग, महेश भागवत, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी दौंड भाजपचे माजी शहराध्यक्ष स्वप्निल शहा, माजी नगरसेवक नंदू पवार,



मनोज फडतरे व इतर पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

पवार म्हणाले की, दौंड एक महत्त्वाचे जंक्शन आहे. नवीन पिढी व्यापारात आली आहे. रेल्वेचे चांगले साधन आहे. त्यामुळे सर्वांचा विचार केला तर शहरामध्ये बऱ्याच गोष्टी करण्यासारख्या आहेत. काही लोकांकडून म्हटले जाते की, बारामतीचा विकास व इतर शहर भकास. असे बिलकुल नाही. मी सर्वांना मदत करतो. शहराला झालेल्या मदतीमधील पैशाचा योग्यरित्या खर्च झाला पाहिजे तरच शहराचा विकास होतो. दौंड तालुक्यातील अनेक रस्त्यांना मी निधी दिलेला आहे. पीएमआरडीए खात्याचा निधी सुद्धा दौंड तालुक्याला आला आहे. अष्टविनायक गणपतीसाठी दीडशे कोटी रुपये आपण खर्च करीत आहोत. योग्य कामाला योग्य ठिकाणी पैसे देण्याची आमची तयारी असते.

बारामती आणि दौंड वेगळी शहरे नव्हती. आम्ही तालुक्यात शैक्षणिक संस्था काढल्या. शहरात जर कोणाला काही नवीन सुरू करावयाचे असेल तर मी राजकारण मध्ये न आणता त्यांना मदत केली. केंद्राच्या आणि राज्याच्या अनेक योजना आहेत. त्या योजना आणून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचे काम करावे लागते तरच शहराचा विकास दिसेल असेही अजित पवार म्हणाले. कार्यक्रमाचे औचित्य साधत पूरग्रस्तांच्या मदतीसाठी स्वप्निल शहा यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी १ लाख ५५ हजार ५५५ रुपयांचा धनादेश अजित पवार यांच्याकडे सुपूर्द केला आहे. पवार यांनी दौंड शहर आणि तालुक्यात जाणीवपूर्वक गुन्हे दाखल करण्याचा उल्लेख यावेळी केला. हा धागा पकडत त्यांनी सत्तेत असलेल्या आणि सध्या तालुक्यात विरोधक असलेल्या नेत्यावर अप्रत्यक्ष टोला लगावला. पोलीस प्रशासनाविषयी बोलताना पवार म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाचा, घटनेचा आदर करून पोलिसांनी काम करावे. निरपराध लोकांना त्रास देऊ नये, फार काळ ते सहन केले जात नाही, हे पोलीस प्रशासनाने ध्यानात घ्यावे.

# इंदापूरात २० वीटभट्टी कामगारांची सुटका : तहसील व पोलिसांची संयुक्त कारवाई



इंदापूर । प्रतिनिधी

उत्तर प्रदेश राज्यातून वीटभट्टी कामासाठी आलेल्या कामगारांचा मुकादम वीटभट्टी मालकांचे कामाचे आगाऊ पैसे घेऊन निघून गेला. त्यामुळे मालकाने २० मजुरांना व त्यांच्या बारा लहान मुलांना अशा एकूण ३२ जणांना नजरकैदेत ठेवले. त्यांची जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने इंदापूर तहसील व पोलिस प्रशासनाने सुटका केली. याप्रकरणी चार जणांवर गुन्हा दाखल केला आहे.(ड्रींशीीं झींपश छ्शी)


वेदप्रकाश (पूर्ण नाव-पत्ता माहीत नाही), सचिन अशोक शिंदे (रा. इंदापूर), कुमार गोकूळ दिवसे (रा. नरुटवाडी, ता. इंदापूर) आणि राहुल नारायण शेटे (रा. भांडगाव, ता. इंदापूर) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. याबाबत शाहरुख गुलाब शाह हसन (वय २५, रा. जोगीपूर, ता. चंदौशी, जि. हसनपूर, उत्तर प्रदेश) याने इंदापूर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्याने उत्तर प्रदेशच्या जिल्हाधिकारी व कामगार आयुक्त तसेच जनसाहस या संस्थेला बंदी करून नजर कैदेत ठेवल्याचे पत्रव्यवहार करीत कळविले. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार ही कारवाई करण्यात आली आहे.

वीटभट्टी मालकाने मुकादमाला दिलेले पैसे मिळत नाही तोपर्यंत सर्व कामगारांनी या ठिकाणी काम करावे लागेल तसेच येथून तुम्ही जाऊ शकत नाही, असे म्हणत त्यांची अडवणूक केली. त्यांना जाण्यास विरोध करीत नजरकैदेत ठेवले तसेच त्यांच्याकडून काम करवून घेतले. इंदापूर तहसील कार्यालय आणि पोलिस प्रशासनाने इंदापूर नरुटवाडी आणि भांडगाव या ठिकाणांहून मंगळवारी (दि. १४) ते शनिवारी (दि. १८) या दिवसांत ३२ पैकी १० पुरुष, १० महिला आणि १२ लहान मुलांना प्रशासकीय भवनातील तहसील कार्यालयाच्या आवारात राहण्याची, जेवणाची व्यवस्था केली होती. शनिवारी सायंकाळी या सर्वांना खासगी वाहनाने उत्तर प्रदेशकडे रवाना करण्यात आले. पुढील तपास इंदापूर पोलिस करीत आहेत.

# किवळे दफनभूमी, कचरा आरक्षण रद्द करा; माजी नगरसेवक मोरेश्वर भोंडवे यांची उपमुख्यमंत्री पवार यांच्याकडे मागणी

रावेत । प्रतिनिधी

रावेत प्रभाग क्रमांक १६ मधील नागरिकांच्या सुरक्षित, स्वच्छ आणि शांत जीवनासाठी माजी नगरसेवक मोरेश्वर भोंडवे यांनी पुढाकार घेतला आहे. भोंडवे यांनी



किवळे येथील प्रस्तावित दफनभूमी आणि केविला समोरील कचरा संकलन आरक्षण तात्काळ रद्द करण्याची मागणी करत नागरिकांच्या मनातील भावना थेट उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या समक्ष मांडल्या.


मोरेश्वर भोंडवे यांनी सांगितले की, या आरक्षणामुळे परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. नागरिकांचे आरोग्य, स्वच्छता आणि परिसरातील शांतता यावर याचा नकारात्मक परिणाम होत आहे. दफनभूमी व कचरा संकलन केंद्र अशा ठिकाणी ठेवणे म्हणजे नागरिकांच्या दैनंदिन जीवनात अस्वस्थता निर्माण करणे होय.भोंडवे यांनी नागरिकांच्या भावना आणि त्यांचे प्रश्न समजून घेत, त्यांचा आवाज प्रभावीपणे उपमुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचविला.

भोंडवे यांनी यापूर्वीही रावेत परिसरातील अनेक सामाजिक आणि नागरी समस्यांवर ठोस भूमिका घेत विकासकामांसाठी पुढाकार घेतला आहे. या भेटीत भोंडवे यांनी केवळ समस्या मांडली नाही, तर नागरिकांच्या हिताचा विचार करून त्या समस्येचे समाधानकारक पर्यायही सुचवले. त्यांच्या या दूरदृष्टीपूर्ण आणि ठाम भूमिकेमुळे अजित पवार यांनी नागरिकांच्या भावनांचा सन्मान राखत, या विषयावर सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. मोरेश्वर भोंडवे यांच्या या पुढाकाराचे संपूर्ण परिसरात कौतुक होत आहे. रावेत-किवळे परिसरासाठी मोरेश्वर भोंडवे खरे जनसेवक आहेत. त्यांनी नागरिकांचा आवाज प्रशासनापर्यंत नेहमीच पोहोचवला आहे, असे मत स्थानिक नागरिकांनी व्यक्त केले.

# पिंपरखेड परिसरामध्ये धुमाकूळ घालणारा तिसरा बिबट्या जेरबंद करण्यात वनविभागाला यश

जांबूत । प्रतिनिधी

पिंपरखेड आणि परिसरात बिबट्यांचा धुमाकूळ सुरू असताना, वनविभागाला मृत शिवन्या बोंबे हल्ल्याच्या घटनास्थळाजवळ तिसरा बिबटा जेरबंद करण्यात यश मिळाले आहे. तरीही या परिसरात बिबट्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण कायम आहे.



बिबट्यांचा बंदोबस्त करण्यासाठी वनविभागाने पिंजरे वाढवावेत, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

आठ दिवसांपूर्वी पिंपरखेड येथे बिबट्याच्या हल्ल्यात चिमुरडी शिवन्या बोंबे हिचा मृत्यू झाल्याने परिसरात प्रचंड खळबळ उडाली होती. या घटनेनंतर संतप्त नागरिकांनी रास्तारोको आंदोलन करत वनविभागाच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरले होते. पिंपरखेड आणि आसपासचा परिसर बिबटमुक्त करण्याची मागणी करत नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती.

बिबट्यांचा बंदोबस्त करण्यासाठी वनविभागाने पिंपरखेड परिसरात १० पिंजरे लावले आहेत. यापैकी मृत शिवन्या बोंबे हल्ल्याच्या घटनास्थळाजवळ लावलेल्या पिंजऱ्यात शनिवारी (१८ ऑक्टोबर २०२५) रात्री एक बिबटी जेरबंद झाली. ही सहा वर्षांची मादी बिबटी असून, तिला माणिकडोह बिबट्या निवारण केंद्रात पाठवण्यात आले आहे, अशी माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे यांनी दिली.पिंपरखेड परिसरात आतापर्यंत तीन बिबटे जेरबंद झाले असले, तरी या भागात बिबट्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. वनविभागाने बिबट्यांचा बंदोबस्त करण्यासाठी मोहीम हाती घेतली असली, तरी पिंजऱ्यांची संख्या अपुरी असल्याने ही मोहीम यशस्वी होईल का, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. बिबट्यांच्या वाढत्या संख्येमुळे परिसरात भीती कायम असून, वनविभागाने अधिक पिंजरे लावून तातडीने कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

# माथाडी कामगार आक्रमक! प्रतिनिधी न ठेवल्याने सरकारी अध्यादेश जाळला

पुणे । प्रतिनिधी

राज्य सरकारने राष्ट्रीय बाजार समिती करण्याबाबतचा निर्णय घेऊन अध्यादेश काढला आहे. मात्र, यामध्ये कामगारांना प्रतिनिधित्व



देण्यात आलेले नाही. त्यामुळे संतप्त माथाडी कामगारांनी ज्येष्ठ कामगार नेते डॉ. बाबा आढाव यांच्या नेतृत्वाखली आंदोलन करीत राष्ट्रीय बाजाराच्या अध्यादेशाची होळी केली.राष्ट्रीय बाजाराबाबत अध्यादेश काढताना कामगारांना विश्वासात घेतले जाईल. राष्ट्रीय बाजार समितीमध्ये हमाल, तोलणारांचा प्रतिनिधी घेतला जाईल, असे आश्वासन तत्कालीन पणनमंत्री अब्दुल सत्तार यांनी डॉ. बाबा आढाव यांनी दिले होते.

याबाबत दिलेली लेखी प्रत आहे. यानुसार हमाल आणि तोलणारांचा प्रत्येकी एक असे दोन प्रतिनिधी असणार होते. मात्र, प्रत्यक्षात कामगारांचा कोणताही प्रतिनिधी देण्यात आलेला नाही. तर, दुसरीकडे व्यापारी वर्गाचे २ वरून ३ प्रतिनिधी करण्यात आले. कामगारांचा प्रतिनिधी नसल्याने कामगारांना काम करणे अवघड होणार आहे.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य कृषि पणन महामंडळाच्या मार्केट यार्ड येथील कार्यालयाबाहेर शासनाने काढलेल्या अध्यादेशाची ज्येष्ठ कामगार नेते डॉ. आढाव यांच्या अध्यक्षतेखाली होळी करण्यात आली. त्यावेळी श्री छत्रपती शिवाजी महाराज कामगार युनियन अध्यक्ष संतोष नांगरे, विशाल केकाणे, संजय साष्टे, सचिन कांदे, दीपक जाधव, अमर रणदिवे, हमाल पंचायतचे चंद्रकांत मानकर, हुसेन पठाण, गणेश पानसरे, नीलेश कुटे, किशोर पावणे, हरिभाऊ खाडे, दत्तात्रय गडदे, तोलणार संघटनेचे संतोष ताकवले, किशोर भानुसगरे यांच्यासह कामगार उपस्थित होते. कामगारांना प्रतिनिधीत्व मिळालेच पाहिजे, कामगार प्रतिनिधींना वगळणाऱ्या सरकारचा निषेध असो, अशा घोषणा यावेळी देण्यात आल्या.

# सायकलींच्या मदतीने सिंहगडच्या आदिवासी, गरजु विद्यार्थ्यांनी केली ज्ञानाची दिवाळी साजरी

**पुणे । प्रतिनिधी**

सिंहगड परिसरातील आदिवासी, दलित आणि गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी ५ ते १० किलोमीटरची पायपीट करावी लागते. अशा विद्यार्थ्यांना दिवाळीच्या निमित्ताने मावळा जवान संघटना आणि निखिल कन्स्ट्रक्शन कंपनीच्या वतीने रविवारी (१९ ऑक्टोबर २०२५) २५ सायकली मोफत वाटप करण्यात आल्या. या अनोख्या भेटीमुळे विद्यार्थी आणि त्यांच्या कुटुंबीयांनी खऱ्या अर्थाने ज्ञानाची दिवाळी साजरी केली.



सिंहगडच्या पायथ्याशी निगडे मोसे येथील शिवशंभू शिल्प सृष्टीत आयोजित ऐतिहासिक दिवाळी आनंदसोहळ्यात हा सायकल वाटपाचा कार्यक्रम पार पडला. सिंहगड-पानशेत परिसरातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि शिक्षणासाठी खडतर संघर्ष करणाऱ्या आदिवासी, कातकरी आणि दलित समाजातील विद्यार्थ्यांना या उपक्रमातून सायकली देण्यात आल्या. सरसेनापती वीर बाजी पासलकर यांचे १२ वे वंशज बाळासाहेब पासलकर यांच्या प्रयत्नांमुळे हा उपक्रम यशस्वी झाला. या प्रसंगी विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांनीही आनंदोत्सव साजरा केला.

'हर हर महादेव, जय शिवराय, जय शंभूराजे, जय वीर बाजी पासलकर' या जयघोषात आणि हलगी-तुरारीच्या निनादात कार्यक्रमाची सुरुवात झाली. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, सरसेनापती वीर बाजी पासलकर आणि राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमांचे तसेच राजदंड आणि ऐतिहासिक दिव्यांचे पूजन बाळासाहेब पासलकर यांच्या हस्ते करण्यात आले. या सोहळ्याला आदिवासी कातकरी समाजातील महिला, युवक आणि अठरा पगड जातींचे सुमारे ५०० हून अधिक वारसदार आणि महिला उपस्थित होत्या.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण सुलभ होणार असल्याने पालकांनी समाधान व्यक्त केले. ओसाडे येथील पालक राजेंद्र विठ्ठल लोहकरे म्हणाले, गोडधोड पदार्थ खाऊन क्षणिक आनंद मिळतो, पण आमच्या मुलांना शिक्षणासाठी सायकल मिळाल्याने आमच्या घरी खऱ्या अर्थाने ज्ञानाची दिवाळी साजरी झाली आहे. मावळा जवान संघटना आणि निखिल कन्स्ट्रक्शन कंपनीच्या या उपक्रमाने गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा मार्ग सुकर झाला आहे. सायकलींच्या या भेटीमुळे विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी होणारी पायपीट थांबणार असून, त्यांच्या शिक्षणातील अडथळे कमी होण्यास मदत होईल. हा उपक्रम सामाजिक बांधिलकी आणि शिक्षणाला प्रोत्साहन देणारा ठरला असून, यामुळे सिंहगड परिसरातील विद्यार्थ्यांमध्ये नवीन आशा निर्माण झाली आहे.

# मी नुरा कुस्ती खेळतो की पट काढून चितपट करतो याची माहिती मोहोळ अण्णांनी त्यांच्या राजकीय वस्तादांकडून घ्यावी; राजू शेट्टींचा पलटवार

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील जैन बोर्डिंगच्या जागेवरून वादाच्या केंद्रस्थानी आलेल्या केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावर माजी खासदार राजू शेट्टी यांनी पलटवार केला आहे. मी नुरा कुस्ती खेळतो की पट काढून कसा चितपट करतो याची माहिती मोहोळ अण्णांनी त्यांच्या राजकीय वस्तादांकडून घ्यावी, असे म्हणत राजू शेट्टी यांनी मोहोळ यांच्या नुरा कुस्तीवरुन पलटवार केला. मोहोळ यांनी जागा प्रकरणात हात झटकल्यानंतर राजू शेट्टी यांनी जागेच्या विक्रीसंदर्भात घटनाक्रम सांगत मोहोळ यांना पुन्हा आरोपांच्या पिंजऱ्यात उभं केलं आहे. पुण्यातील जागेवरून राजू शेट्टी यांनी ३ हजार कोटींची जागा २३० कोटीत हडपडल्याचा गंभीर आरोप मुरलीधर मोहोळ यांच्यावर केला. शिवसेना शिंदे गटाचे रवींद्र धंगेकर यांनीही मोहोळांवर आरोपांची मालिका केली आहे.



राजू शेट्टी यांनी मोहोळ यांनी केलेल्या टीकेनंतर प्रत्युत्तर दिले. राजू शेट्टी म्हणाले की, मी माहिती न घेताच एचएनजी बोर्डिंगच्या संदर्भात वक्तव्य केली आणि मी नुरा कुस्ती खेळणारा माणूस आहे अशा प्रकारचे आरोप केले. मुरलीधर अण्णांच्या माहितीसाठी मी सांगतो की मी आठ सप्टेंबरला जैन बोर्डिंगची जागा विकायची त्या संदर्भात जो साठेखत झालं होतं त्या संदर्भात हरकत घेणारे पत्र पुणे महापालिका आयुक्त, धर्मादाय आयुक्त, गोखले कंपनी आणि महाराष्ट्र सरकार या सगळ्यांना पाठवलेलं होतं, कारण मुळामध्ये हा जो एचएनजी ट्रस्ट आहे त्या ट्रस्टच्या उपनियमांप्रमाणे संस्थेची मालमत्ता विकायचा अधिकार कोणालाही नाही. असं असताना धर्मादायुक्तांनी खरं तर या ही जागा विकायला परवानगी दिली हेच मोठं गौडबंगाल आहे. १३ फेब्रुवारीला मालमत्ता विकण्याच्या संदर्भात ट्रस्टचा अर्ज जातो. त्यानंतर लगेच दीड महिन्याच्या आत धर्मादाय आयुक्त त्याला परवानगी देतात. त्याआधी ते उपनियम, आर्थिक स्थिती तपासत नाही. ३१ मार्च २०२५ पर्यंत ट्रस्टकडे आठ कोटी रुपये शिल्लक होते, तरीसुद्धा आर्थिक अडचणीमुळे आम्ही जागा विकत होतो असं ते म्हणत असतील, तर त्यावर विश्वास ठेवायचा? अशी विचारणा त्यांनी केली. ते पुढे म्हणाले की, विश्वस्त चकोर गांधी यादी ५ ऑक्टोबरला राजीनामा दिला आणि त्यांनी हे सांगितलं की माझी दिशाभूल केली गेली. आम्हाला दूरध्वनीवरून म्हणजे बैठक तर झाली नाही. आम्हाला सांगितलं की जागा विकसित करायची आहे. प्रत्यक्षात माझी दिशाभूल करून सही घेतली. त्यामुळे ६ ऑक्टोबरपासून मी या पदावर नाही इथून पुढे होणाऱ्या कुठल्याही निर्णयास मी बांधील नाही असं लिहून त्यांनी राजीनामा दिला आहे. ८ ऑक्टोबरला खरेदीखत झालं आहे, त्याच दिवशी गहाणखत झालं आहे. बुलढाणा अर्बन बँकेनं त्याच दिवशी २० कोटी रुपये तसेच भिडेश्वर क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीनं ५० कोटी रुपये कर्ज दिलं. गहाणखत आणि खरेदी खत त्याच दिवशी एवढ्या जलद गतीने झाले. योगायोग असा आहे की या विक्रीला परवानगी देणारे जे धर्मादाय आयुक्त कलोटी आहेत हे मुख्यमंत्र्यांच्या जवळचे नातेवाईक आहेत. ते हजर झाल्यानंतर आठवड्याच्या आत जागा विक्रीचा अर्ज जातो, त्यानंतर दीड महिन्याच्या आत ते परवानगी देतात.

# ऐकू न येणाऱ्या खेळाडूंच्या राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेसाठी विवेक मालशे यांची प्रशिक्षक म्हणून निवड

पिंपरी । प्रतिनिधी

इंडियन डेफ क्रिकेट असोसिएशन (खऊ-) यांच्या वतीने दि. ३ नोव्हेंबर ते ९ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत नवी दिल्ली येथे ९ वी नॅशनल डेफ टी-२० क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी महाराष्ट्र डेफ क्रिकेट संघाच्या प्रशिक्षकपदी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मध्यवर्ती भांडार विभागाचे भांडारपाल विवेक मालशे यांची निवड करण्यात आली आहे.

या प्रतिष्ठित स्पर्धेत देशभरातील २० राज्यांतील संघ सहभागी होणार असून, ऐकू न येणाऱ्या खेळाडूंसाठी ही स्पर्धा कौशल्य, आत्मविश्वास आणि संघभावनेचे उत्कृष्ट प्रदर्शन ठरणार आहे. या माध्यमातून दिव्यांग खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावर



स्वतःचे स्थान निर्माण करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

महाराष्ट्र डेफ क्रिकेट संघाचे प्रशिक्षक म्हणून निवड झालेल्या विवेक माळगे यांनी २००५ साली टायगर डेफ स्पोर्ट्स असोसिएशन ही संस्था स्थापन करून ऐकू न येणाऱ्या खेळाडूंसाठी सातत्याने कार्य केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र संघाने अनेक राष्ट्रीय स्पर्धांमध्ये विजेतपदासह उल्लेखनीय यश संपादन केले आहे. क्रिकेटच्या माध्यमातून दिव्यांग खेळाडूंना समाजमुखी ओळख मिळवून देणे हे त्यांचे ध्येय आहे.

विवेक मालशे यांची निवड महाराष्ट्रासाठीच नव्हे, तर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठीही अभिमानाची बाब आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र संघ निश्चितच उत्कृष्ट कामगिरी करेल आणि त्यांच्या कार्यामुळे शहरातील युवा खेळाडूंना प्रेरणा मिळेल, असा विश्वास महापालिका प्रशासनाने व्यक्त केला आहे.

महानगरपालिकेच्या वतीने विवेक मालशे यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले असून, आगामी स्पर्धेसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# माहिती अधिकार संघटनेच्या वतीने सफाई कामगारांची प्रकाश दिवाळी

पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी

(दिनांक १९ ऑक्टोबर २०२५) रोजी जागृत नागरी महासंघ माहिती अधिकार समितीच्या वतीने पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी 'क' क्षेत्रीय कार्यालय, भोसरी २६ या ठिकाणी पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांचे आरोग्य अबाधित ठेवून शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवणाऱ्या महानगरपालिका सफाई कामगार व घंटागाडी वर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा जागृत नागरिक महासंघाच्या वतीने आकाश कंदील दिवाळी भेट देऊन सन्मान करण्यात आला आणि खऱ्या अर्थाने महासंघाने दिवाळी साजरी केली त्यावेळी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागाचे सहाय्यक आयुक्त मा श्री दशरथ लिलाबाई दत्तात्रय कांबळे साहेब यांच्या हस्ते घंटागाडीवर काम करणाऱ्या साठ कर्मचाऱ्यांना



## घंटागाडी सफाई कामगारांना आकाश कंदीलाचे वाटप

दिवाळी भेट म्हणून आकाश कंदील देऊन सन्मान करण्यात आला श्री कांबळे साहेबांनी जागृत नागरिक महासंघाच्या कार्याचा गौरव करत दिवाळी भेट म्हणून आकाश कंदील वाटप हा उपक्रम सर्वप्रथमच शहरात होत असल्याचे सांगून महासंघा चे अभिनंदन केले त्यावेळी माहिती अधिकार समितीचे अध्यक्ष नितीन यादव यांनी सफाईक सफाई कर्मचारी हे खऱ्या अर्थाने शहराचे स्वच्छता दूत आहेत असे सांगून गेल्या अनेक वर्षापासून संपूर्ण महाराष्ट्रभर माहिती अधिकार कायद्याचा अतिशय चांगल्या पद्धतीने प्रचार प्रसार करून प्रशिक्षण देतो याची माहिती दिली सर्वसामान्य गोरगरीब नागरिक व शासकीय कर्मचाऱ्यावर झालेल्या अन्यायाविरोधात कशा पद्धतीने माहिती अधिकाराचा १००% सकारात्मक वापर करून लढा देत असतो याची जाणीव करून दिली त्यावेळी प्रसिद्ध व्याख्याते व निवेदक मा श्री राजाराम सावंत यांनी अतिशय उत्कृष्टपणे सूत्रसंचालन करत असताना पिंपरी चिंचवड शहर स्वच्छ आणि सुंदर बनवण्याचं काम हे आरोग्य विभागाचे कर्मचारी सातत्याने करत असतात परंतु त्यांचा सन्मान आणि सत्कार करण्याचा काम नितीन यादव यांच्या मार्गदर्शनाखाली जागृत नागरिक महासंघातर्फे सफाई कर्मचाऱ्यांना आकाश कंदीलाच्या रूपाने दिवाळी भेटवस्तू देऊन त्यांच्या घराचा प्रकाश उज्वल करण्याचं काम करण्यात आले असे सांगितले यावेळी क क्षेत्रीय कार्यालय प्रशासन अधिकारी श्रीम सुनिता वायकर, उपस्थित होत्या तसेच सफाई कर्मचारी सुपरवायझर श्री श्याम शिरसाट,यांच्यासह अनेक सफाई कामगारा व सुरक्षा कर्मचारी या ठिकाणी उपस्थित होते सफाई कामगारांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून आम्हाला खऱ्या अर्थाने सामाजिक काम केल्याचा अभिमान वाटत आहे असे सांगून त्यांच्या भावना अनावर झाल्या संस्थेचे अध्यक्ष नितीन यादव यांनी यावेळी बोलताना सांगून क क्षेत्रीय अधिकारी माननीय श्री अजिंक्य येळे साहेब यांनी या उत्कृष्ट अशा सामाजिक कार्यासाठी त्यांचा हॉल उपलब्ध करून दिला त्याबद्दल त्यांचे आभार मानले जागृत नागरिक महासंघाचे मावळ समितीचे अध्यक्ष दत्तात्रय काजळे, मच्छिंद्र गुजर, सुनील गुजर, तसेच महासंघाचे पिंपरी चिंचवड शहर प्रमुख अशोक कोकणे,सचिव राजू डोगीवाल, खजिनदार रोहिणी यादव, श्रीनिवास कुलकर्णी, अरविंद पांचाळ, सातारा जिल्हाअध्यक्ष प्रकाश पाटील, ओंकार भागवत, राजेंद्र कदम, राजश्री शिर्के रघुनाथ हांडे दीपक नाईक, प्रकाश गडवे, अरविंद पांचाळ, श्रीनिवास कुलकर्णी सुनील साळवे, व पदाधिकारी उपस्थित होते